# श्री साईदरबार विशेषांक



श्री साईबाबांची धुनी

मे ] कि. ६० पैसे | १९६२

# श्रीसाई उदीने बनविलेली मूर्ती –



मुंबापुरीतील प्रख्यात कलाकार व गिरगावच्या महिला कलामंदिराचे संचालक श्री. डी. के. जाधव मास्तर यांनी केवळ श्री साईबाबांच्या उदीने श्री साई-बाबांची सुबक मूर्ती तयार केली असून ती दर्शनासाठी त्यांनी आपल्या 'गुरुप्रसाद', कलानगर, वांद्रा येथे ठेवली आहे. सदरहू मूर्तीची पूजा करताना प्रख्यात चित्रचांदणी आशा सचदेव

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

काम-कर्म-बंध विमुक्त ।
सर्वैषणा-विनिमुक्त ।
देह-गेहादिकीं विरक्त ।
जगीं भक्त तो धन्य ॥७१॥

साईंजयाचा दृष्टिविषय ।
तया विश्वांतर दिसेल काय ।
दृश्य मात्रीं साईंशिवाय ।
रिकामा ठाय दिसेना ॥७२॥

वदनीं श्रीसाईंचें नाम ।
हृदयीं श्रीसाईंचें प्रेम ।
तया नित्य आराम क्षेम ।
रक्षी स्वयमेव साईं त्या ॥७३॥

श्रवणाचीही तीचगत ।
शब्द नाहीं साईव्यतिरिक्त ।
घ्राणी साईं परिमळ भरत ।
रसना पघळत साईरसें ॥७४॥

सुखाचें जें सोलीव सुख ।
काय साईंचें सुहास्य मुख ।
धन्य भाग्याचा तो देख ।
जेणें तें शब्द पीयूष सेविलें ॥७५॥

-श्रीसाईसच्चरित्, अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] मे १९७९ [ अं. २

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका — मे १९७९


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | — | श्रीसाई दरबार विशेषांक |
| २) श्रीसाई पुतळयाचे शिल्पकार कै. तालीम | — | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३) श्री. हरीश तालीम पुतळयाबद्दल सांगतात | — | श्री. हरीश तालीम |
| ४) बाबांचा सेवक–काशिराम शिंपी | | — |
| ५) बाबांचे निष्ठावान सेवक — म्हाळसापती भगत | — | श्री. चंद्रकांत सामंत |
| ६) बाबांची मित्र मंडळी — बाबा, नाना डेंगळे व निमोणकर | | — |
| ७) श्री देवदास, गंगागीरबाबा व आनंदनाथ | — | — |
| ८) बाबांचा नित्यक्रम | — | श्री. द. शं. टिपणीस |
| ९) साईसच्चरित्रकार गोविंदराव दाभोलकर | — | डॉ. गजाननराव दाभोलकर |
| १०) सॉलिसिटर काकासाहेब दिक्षित | — | प्रा. र. श्री. पुजारी |
| ११) साईभक्त काकासाहेब दिक्षित | | — |
| १२) डेप्युटी कलेक्टर हरी विनायक साठे | — | प्रा. र. श्री. पुजारी |
| १३) बाबांचा एकनिष्ठ भक्त 'शामा' | — | — |
| १४) परम साईभक्त नानासाहेब चांदोरकर | — | सदानंद चेंदवणकर |
| १५) परमभक्त श्रीराधाकृष्णामाई | — | — |
| १६) साईभक्त श्री. बापूसाहेब जोग | — | — |

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# श्रीसाई दरबार विशेषांक

श्रीसाईलीला मासिकाचा हा श्रीसाई दरबार विशेषांक म्हणून श्रीसाईप्रेमींच्या हाती देताना आनंद होत आहे. श्रीसाईबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीच्या निमित्याने आम्हीं गतसाली श्रीसाईलीलाच्या तेरा खास अंकांची योजना आखली व ती योजना आतापर्यंत तरी श्रीसाई कृपेने यशस्वी वाटचाल करीत आली आहे. खास अंक मालीकेतला हा सातवा खास अंक आहे. श्रीसाईच्या हयातीत त्यावेळी त्यांच्या सहवासात जी सद्भागी प्रमुख मंडळी खूपखूप वावरली व ज्यांनी बाबांचे नाव चिरस्मरणीय करून ठेवले, तसेच बाबांनासुद्धा या मंडळींची हरघडी आठवण होत राहिली अशा या साईच्या दरबारातील प्रमुख मंडळींचा ऋण निर्देश बाबांच्या साठाव्या पुण्यतिथीच्या निमित्याने करणे उचित होय. या उद्देशाने या अंकामधे बाबा जेव्हा शिरडीत आले तेव्हाचे गंगागीर बाबा, बाबांचे पहिले सेवेकरी कै. म्हाळसापती सोनार, महादू फसले, काशिराम शिंपी, आप्पा जागले, बाबांचे नित्य सहवासातील श्री. माधवराव देशपांडे, सुशिक्षित भक्त श्री. नानासाहेब चांदोरकर, बाबांचे चरित्रकार श्री. अण्णासाहेब दाभोळकर, बाबांची व बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्यांची सर्वती सोय करण्यात गर्क असलेले भक्त श्री. दिक्षित, श्री. साठे, नागपूरचे श्री. गोपाळराव बूटी इ. इ. ची भरपूर माहिती दिलेली आहे. यातील काही लेख मुद्दाम अधिकारी व्यक्तिकडून लिहवून घेतले आहेत तर काही तयार केले आहेत.

यातच भर म्हणून की काय श्रीसाईबाबांच्या शिरडी समाधीमंदिरातील श्रीसाईमूर्तीच्या प्रतिष्ठापनेला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या रौप्यमहोत्सवा-निमित्य मूर्तीकार कै. श्री. बाळाजीराव तालीम यांचा अल्प परिचय व त्यांचे आंतर-राष्ट्रीय कीर्तीचे मूर्तीकार चिरंजीव श्री. हरीशभाई तालीम यांची, बाबांचा पुतळा जास्तीत जास्त काल सुस्थितीत टिकविण्याच्या दृष्टीने घेतलेली मुलाखत या अंकातच दिली आहे. यामुळे आमच्या वाचकांना हा अंक वाचनीय व संग्राह्य वाटेल यात शंका नाही.

---


### श्रीसाईलीलेचा जून अंक

### श्रीसाईबाबा अगम्य लीला विशेषांक

श्रीसाईबाबांनी आपल्या उभ्या हयातीत विविध प्रकारच्या चमत्कार-लीला दाखविल्या, त्यांचे एकत्र दर्शन घडविणारा अंक वाचण्यास चुकू नका.

# श्रीसाईबाबांच्या पुतळ्याचे शिल्पकार

# कै. बाळाजी वसंत तालीम

********************

—सदानंद चेंदवणकर



कै. बाळाजीराव तालीम

● मुंबापुरीत गिरगाव विभागात प्रसिद्ध काँग्रेस हाऊसच्या समोरच एका प्रसिद्ध शिल्पकाराचा स्टुडिओ आहे. त्याचे नाव आहे 'तालीम आर्ट स्टुडिओ.' या स्टुडिओत पाऊल टाकले की मनुष्यमात्राला थक्क करून सोडणाऱ्या असामान्य कलेचे भांडार दिसू लागते. कितीतरी वंदनीय भारतीय व्यक्तींचे, जणू काही तिथे संमेलनच भरले आहे की काय असा भास होतो. कितीतरी देवादिकांच्या मूर्ती, संतांच्या मूर्ती शांत, प्रसन्न, हसमुख चेहऱ्याने तिथे आहेत हे पाहून मनाला संतोष तर वाटतोच व या प्रचंड दालनातून हलूच नये असे होऊन जाते. शिरडीच्या समाधी मंदिरात पंचवीस वर्षापूर्वी बसविण्यात आलेला संगमरवरी भव्य पुतळा याच स्टुडिओत तयार झाला आहे व याच पुतळ्याची प्लॅस्टरची भव्य प्रतीकृती याच स्टुडिओत भाविकांना अजुनही दर्शन देत आहे. मनोजकुमारच्या 'शिरडीके साईबाबा' या चित्रपटासाठी ही भव्य प्रतीकृती अंधेरीला हालविली होती पण ती काही काळापुरतीच.

शिरडीच्या या पुतळ्याचे काय किंवा स्टुडिओतल्या या पुतळ्याचे काय शिल्पकार आहेत कै. बाळाजी वसंत तालीम. महाराष्ट्रातले एक प्रसिद्ध शिल्पकार, मूर्तीकार म्हणून त्यांचा त्यावेळी लौकिक होता. त्यांचा जन्म हैद्राबाद येथे १८९० मधे झाला. त्यांचे वडील तिथे बिल्डिंग कॉनट्रॅक्टर होते. हैद्राबादचा एकावेळच्या निजामसाहेबांच्या फलकनुमा पॅलेसची बांधणी त्यांनी केली होती. वडिलांच्या

मृत्यूनंतर बाळाजी व त्यांचे दोघे भाऊ यांना घेऊन त्यांची आई सुमतीबाई मुंबईला आल्या व आपल्या मुलांचे शिक्षण व लालन पालन पोषण त्यांनीच केले.

बाळाजींचे शिक्षण मुंबईच्या सेंट झेवियर्स हायस्कूलमधे मॅट्रिकपर्यंत झाले. लहानपणापासूनच त्यांचा ओढा चित्रकलेकडे, म्हणून त्या कलेत प्रावीण्य मिळविण्यासाठी त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश केला. तिथे ते मॉडेलिंग, पेंटिंग व आर्किटेक्ट या तिन्ही विषयांचा अभ्यास करीत होते. त्यावेळी तिथे मॉडेलिंगला एक शिष्यवृत्ती होती पण ती लायक विद्यार्थ्यांच्या अभावी बंद करण्यात आली होती. ती शिष्यवृत्ती आपल्याला मिळावी असे तरुण कलाकार बाळाजीरावांना राहून राहून वाटे. म्हणून त्यांनी त्यावेळचे प्रिन्सीपॉल बर्नसाहेब यांना भेटून तशी विनंती केली. तेव्हा ते त्यांना म्हणाले, हे पहा, "आधी ब्रिटानिया स्टॅच्यूचं एक लहानसं मॉडेल तयार करून आण पाहू ! मग ठरवीन काय ते."

बाळाजींनी लागलीच एक मॉडेल तयार करून त्यांना दाखवले व ते बघून बर्नसाहेब इतके खूष झाले की त्यांनी लगेच खिशात हात घालून पन्नास रुपये हातावर ठेवले व म्हणाले, "तुला स्कॉलरशिप सुरू केली आहे पण ती एका अटीवर. आजपासून पेंटींग व आर्किटेक्ट सोडून देऊन तुला मॉडेलिंगचच काम करावं लागेल, यातच तुला तुझे जीवन वेचावे लागेल." बर्नसाहेबांच्या अटीला मान देऊन तालीम काम करू लागले. शिल्पकार म्हात्रे यांच्या शिल्पकलेकडे ते अतिशय आकर्षित झाले. प्रिं. बर्न व शिल्पकार म्हात्रे या दोघांना ते गुरुस्थानी मानीत असत. पाच वर्षे जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेतल्यावर व्हिजिटींग प्रोफेसर म्हणून बाळाजी तालीम यांना मान्यता मिळाली.

शिल्पकार बाळाजी तालीम यानी १३-७-१९२३ ला पहिला मोठा पुतळा केला तो म्हणजे दादाभाई नौरोजींचा. दादाभाईंचा हा पुतळा लंडनला तयार व्हावा म्हणून ऑर्डरही देण्यात आली होती. येथे पाश्चात्य तोडीचा भारतीय शिल्पकार नाही असे अनेकांचे त्यावेळी म्हणणे होते. परंतु स्कूल ऑफ आर्टचे प्रिं. ग्लॅडस्टन सोलोमन व भारतीय शिल्पकारांबद्दल आदर दाखविणारे श्री. कन्हयालाल वकील या मंडळींनी बाळाजीराव तालीमांच्याकडे हा पुतळा तयार करण्याची दादाभाई नौरोजी पुतळा समितीला विनंती केली. समितीने लंडनला तर ऑर्डर दिलीच, शिवाय तालीमना पण पुतळा तयार करण्याची आज्ञा केली, आणि विशेष म्हणजे लंडनच्या पुतळयापेक्षा तालीमांच्या पुतळयाचे काम शतपटीने सरस झाले; व तालीमांची ख्याती सर्वत्र झाली. आज हा भव्य पुतळा हुतात्मा चौकात ओरिएंटल बिल्डिंगच्या समोर बसविण्यात आलेला आहे. तालीमांचा स्टुडिओ त्यावेळी

त्रिभुवन रोडला होता व त्याचे नाव होते सरस्वती स्टुडिओ. १९२८ साली त्यांनी आजचा स्टुडिओ बांधला.

बाळाजीराव तालीम यांनी त्यानंतर मुंबईच्या वरीष्ठ न्यायालयाचे प्रख्यात न्यायमूर्ती सर लॉरेन्स जेकीन्स यांचा उत्कृष्ट पुतळा तयार केला. 'पुंगीवाला गारुडी' हा त्यांचा अद्वितीय पुतळा तर १९२६ साली लंडनला भरलेल्या वेम्ले प्रदर्शनात ठेवण्यात आला होता व त्याची मुक्तकंठाने प्रशंसा ब्रिटनचे तत्कालिन पंतप्रधान लॉइड जॉर्ज यांनी केली होती. आंध्र प्रदेशात वसविलेला संत मेहेरबाबांचा, पुणे विद्यापीठातला श्रीसरस्वती देवीचा, राजस्थानातील पिलानी विद्यापीठातले महात्माजींचे व सरदारजींचे लाईफ साइजचे पुतळे, बनारस हिंदु विद्यापीठातला पं. मदनमोहन मालवियजींचा, हे पुतळे तर तालीमांच्या अजोड कसबाची साक्ष देतात. महात्माजी, कै. डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, पंतप्रधान मोरारजी देसाई या मंडळींनीही त्यांच्या स्टुडिओत पुतळ्याच्या कामासाठी बैठकी मारल्या आहेत.

श्रीसाईबाबांच्या या पुतळ्याचे काम त्यांचेकडे जेव्हा आले तेव्हा संस्थानतर्फे त्यावेळची अधिकारी मंडळी त्यांचेकडे आली. मुंबईतील प्रसिद्ध शिल्पकारांकडे जाऊन ही मंडळी आली होतीं व त्या प्रत्येकाला त्यांनी बाबांचा एक हुबेहुब फोटो पुरविला होता व त्यावरहुकूम तंतोतंत असा पुतळा हवा आहे असे त्यांनी तालीमनाही सांगितले. ज्या मूर्तीकाराचे ट्रायल मॉडेल पसंत पडेल त्याला बाबांच्या पुतळ्याचे काम देऊ असे त्यांनी पुढे सांगितले. त्यावेळी तालीमनी या समितीला चक्क सांगितले की हे काम मी फुकट करणार नाही. सर्व कलाकारांचा यात वेळ मोडणार आहे, त्यांना खर्च होणार आहे, व केले मॉडेल जर पसंत पडले नाही तर सारेच श्रम अक्षरशः वाया जाणार आहेत, तेव्हा प्रत्येक कलाकाराला एक-एक हजार रुपये खर्चासाठी द्यावेत. ही अट समितीला एकदम पसंत पडली. प्रत्येक शिल्पकाराला हजार-हजार रु. दिले गेले. योग्यवेळी समितीची मंडळी कलाकारांकडे जाऊन पुतळा पाहून शेवटी तालीमांच्या स्टुडिओत पुतळा पाहण्यासाठी आली. आणि काय आश्चर्य! त्या सर्वांना श्रीसाईबाबांचे केले मॉडेल एकदम पसंत पडले! पुण्याच्या एका सद्गृहस्थांनी तर या मॉडेलमध्ये व बाबांमध्ये तिळमात्र फरक नाही असे आग्रहाने सांगितले.

या साऱ्या मंडळींनी बाबांना साक्षात् पाहिले होते. यामुळे बाबांच्या मूर्तीचे काम श्री. बाळाजीराव तालीमांकडे ओघानेच आले. रात्रंदिवस खपून त्यांनी ही मूर्ती बनविली ती इतकी सुबक की तिच्या दर्शनासाठी भाविक स्टुडिओत गर्दी करू लागले. रात्री १० वाजेपर्यंत त्यांच्या स्टुडिओत गर्दी असायची व नारळ, हार, फुले, पेढे यांचा ढीग जमत असे. थोडक्यात स्टुडिओचे मंदिरात रुपांतर झाले होते. पण असे जरी झाले तरी तालीमांना मूर्तीचे समाधान नव्हते. त्यांना बाबांचे नाक

कसे होते, डोळे कसे होते, इ. बारकाव्याबद्दल एकच तळमळ लागून राहिली होती व अशा या व्याकूळ अवस्थेत असतानाच त्यांना एका पहाटेस स्टुडिओत आल्यावर या तयार केलेल्या पुतळयाजवळ बाबांनी अगदी साक्षात् दर्शन क्षणभर दिले ! ! त्यामुळे त्यांचे डोळे अक्षरशः दिपले व या गोष्टीचा इष्ट तो परिणाम होऊन बाबांचे बद्दलचे सूक्ष्म ज्ञान अवगत झाले. रामकृष्ण परमहंसांची मूर्ती बनवितानासुद्धा त्यांना असाच अनुभव आला होता ! ! साक्षात् रामकृष्ण त्यांच्या स्टुडिओत भर दुपारी त्यांचे समोर येऊन उभे राहिले होते !

शिरडीच्या श्रीसाईबाबांच्या भव्य पुतळयामुळे श्री. तालीम यांची किर्ती अमर झाली आहे. अनेक भारतीय व परकीय शिल्पकारांनी हा मनोहर पुतळा बघून त्याची वारेमाप स्तुती केली आहे. तालीमांनी आपल्या हयातीत सुमारे ४०० पुतळे तयार केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याना १७ सुवर्ण पदके मिळाली. ता. २५ डिसेंबर १९७० रोजी शिरडीच्या बाबांच्या पुतळयाचे हे शिल्पकार श्रीसाईचरणी विलीन झाले त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षाचे होते. त्यांनी तयार केलेले व ठिकठिकाणी बसविले गेलेले पुतळे हीच त्यांची आठवण आहे असे म्हणण्यापेक्षा त्यांची स्मारकेच आहेत असेच म्हणणे योग्य वाटेल.

---

● शिरडी समाधी मंदिरातील श्रीबाबांच्या मूर्तीप्रमाणेच मूर्ती ४ फूट, २॥ फूट, २ फूट, १॥ फूट मार्बलच्या तसेच पंचधातूंच्या उपलब्ध. तालीम आर्ट स्टुडिओ, व्ही. पी. रोड, कॉंग्रेस हाऊस समोर, गिरगाव, मुंबई ४
दूरध्वनी क्रमांक ३६९३९५

## मूर्तिकार श्री. हरीश तालीम

# श्रीसाईबाबांच्या पुतळ्याबद्दल सांगतात



श्री. हरीश तालीम

शिरडीच्या समाधी मंदिरातील श्रीसाईबाबांची जी मूर्ती तयार केलेली आहे ती इटालीयन मार्बलची आहे. हा इटालीयन मार्बल 'कराका मार्बल' या नावाने ओळखला जातो. इटलीमधे कराका या शहरी या जातीच्या संगमरवराच्या खाणीच्या खाणी आहेत. येथे आणखीन एका जातीचा मार्बल आहे, त्याचे नाव आहे 'टोरँको मार्बल,' पण हा मार्बल कमी दर्जाचा आहे. 'कराका मार्बल' हा 'ए ग्रेड'चा संगमरवर म्हणून जगभर प्रसिद्ध आहे.

शिरडीच्या साईबाबांची मूर्ती साडे पाच फूट उंच आहे व ती सव्वातीन फूट लांब व अडीच फूट रुंद अशा चौरस चौथऱ्यावर अधिष्ठीत आहे. या मूर्तीला त्यावेळी तयार करण्यास २२ हजार रु. खर्च आला. आज अशीच मूर्ती तयार करावयास ६५ हजार रु. खर्च येईल, पण मूर्तीला कराका मार्बल तयार करण्यासाठी मिळणार नाही. कारण हा विशिष्ट जातीचा संगमरवर परदेशाहून आयात करावा लागतो व सरकारने परकीय चलनाच्या नावाखाली हा मार्बल भारतात आणण्याचे परवाने देणे अजिबात बंद करून टाकले आहे. यामुळे भारतीय शिल्पकारांना जयपूर-उदयपूर येथील खाणीतील मकराणा संगमरवरावर अवलंबून रहावे लागते. पण या संगमरवरात कुठे ना कुठे तरी दोष असतो त्यामुळे या मार्बलची मूर्ती तयार करताना आता शिल्पकारांना मूर्तीच्या बाबतीत शंभर टक्के गॅरंटी देता येत नाही.

शिरडीची श्रीबाबांची मूर्ती तयार करण्यास सात महिन्यांचा अवधी लागला. ही मूर्ती बसवून आता २५ वर्षे झालीत पण या काळात मूर्ती खूपच झिजली आहे असे बारकाईने पहाता दिसून येईल. पुढील २५ वर्षात तर ती आणखीन झिजेल

यात शंकाच नाही. तेव्हा या मूर्तीचे सौंदर्य, भव्यता सुरक्षित ठेवायची असेल तर मूर्तीला रोजच्या रोज स्नान घालता कामा नये. गरम पाण्याचे स्नान तर अजिबात घालू नये. कारण गरम पाण्याने संगमरवर ठिसूळ होतो. दही दूध तर मूर्तीवर अजिबात ओतू नये. कारण या दोन्ही पदार्थांत आम्ल असल्याने त्याचा रोजच्या रोज परिणाम मूर्तीवर होतो. मूर्तीच्या दाढीचे केस, मिशीचे केस, हातापायांची नखे ही तर आत्ताच झिजलेली आहेत आणि हे जर असेच चालू राहिले तर नजिकच्या काळात ही बाबांची मूर्ती पंढरपूरच्या विठोबाच्या मूर्तीसारखी अगदी गुळगुळीत होईल अशी भीती वाटते. मूर्तीला हळद-कुंकू आता तर अगदी मुळीच लावू नये. कारण त्यामुळे भोके पडण्याचा संभव असतो. त्याऐवजी गोपीचंदनाचा टिळा लावावा. आठ दिवसांनी मूर्तीला स्नान घालावे आणि टॉवेलने पुसू नये. फक्त कापडाने पाणी टिपावे. यामुळे मूर्ती आणखीन काही काळ तरी निश्चितपणे टिकेल, झीजणार नाही.

● ● ●


कॅसेटस्! कॅसेटस्!! कॅसेटस्!!

**साई महिमा** – एका बाजूस

**साईबाबा भजन** – दुसऱ्या बाजूस

९० मिनिटांच्या या कॅसेटस् कुर्ल्याचे साईभक्त श्री. नारायणबाबा यांच्या कंठातून उतरल्या असून त्यांची किंमत भारतीय बनावट – ३५ रुपये व परदेशी बनावट ५२ रु. अशी आहे.

श्री. नारायणबाबा, श्री भगवती साई संस्थान, रेल्वे कॉलनी, कुर्ला, मुंबई – ४०० ०२४ येथे त्या मिळतील.

बाबांचा सुरुवातीचा सेवक

# काशीराम शिंपी

● श्रीसाईबाबा जेव्हा शिरडीत आले तेव्हा 'आओ साईबाबा' म्हणून त्यांचे स्वागत करणारे म्हाळसाकांत, काशीराम शिंपी व आप्पा जागले हे तिघेजण त्यांची मनोभावे सेवा करू लागले. काशीराम तर बाबांचा महाभक्त झाला. त्याने महाराजांची सेवा उत्तम तऱ्हेने व तनमनाने केली, धनाने पण केली. महाराजांची कफनी पूर्वी भगवी किंवा पांढरी असे पण काशीरामने हिरवी कफनी व हिरवी टोपी महाराजांना शिवून दिली. त्याने महाराजांना चिलीम तंबाखू सुरवातीला पुरविली इतकेच नव्हे तर धुनीला सरपणासाठी लाकडे पण पुरविली. पुढे पुढे तर तो पैशाची आपली थैलीच महाराजांपुढे ठेवायचा; व इच्छेस येतील तेवढे पैसे आपण घ्या असे तो बाबांना म्हणायचा. महाराज त्यावेळी दक्षिणा घेत नसत. पण काशिराम कडून पैसा दोन पैसे ते घेत. बाबांनी आपल्याकडून दक्षिणा घ्यावी याबद्दल काशिरामला आतुरता असे व एखाद दिवशी बाबांनी जर दक्षणा घेतली नाही तर त्याला अतिशय वाईट वाटे व त्याच्या डोळयातून अश्रू येत. पण अशा प्रकारे वाईट वाटणेसुद्धा परमार्थाला विघातक आहे. कारण त्यात माझी देण्याची शक्ति आहे अशा तऱ्हेचा अभिमान शिरतो. अर्थात्, भक्ताच्या परमार्थाला विघातक गोष्टी असतील त्या काढून टाकण्याचा देवाचा नित्यसंकल्प असतो. त्याप्रमाणे काशीरामासही झाले. पुढे काही दिवसांनी त्याची पैशासंबंधाने ओढाताण होऊ लागली, व इकडे बाबांनी तर त्याच्या जवळ दक्षिणा मागण्याचा सपाटा चालविला, व पैसे संपले असे त्याला मोठ्या कष्टाने म्हणावे लागले. मग वाण्याजवळून मागून आणून मला दे असे महाराजांनी म्हटले. त्याप्रमाणे काही दिवस वाण्याकडून मागून आणण्याचा क्रम चालू ठेवला. पण पुढे वाणीही पैसे देईनात अर्थात् ही सारी लीला काशीरामचा अभिमान दूर करण्यासाठीच होती. पुढे त्याची अशी खात्री झाली की, आपली देण्याची शक्ति नाही व हे त्याला पटल्या-बरोबर त्याची सांपत्तिक स्थिती सुधारून गेली व तो पूर्वीप्रमाणे सुखवस्तु झाला. पुढे महाराजांनी आपल्याकडून दक्षिणा घ्यावी ही त्याची तळमळ पार नाहीशी झाली.


बाबांचा हा असा सच्चा सेवक शके १८३० च्या चैत्रात मरण पावला. त्याला मरताना एकादशी लाभली. हरिभक्ताचे मरण हरिदिनीच होणे योग्य व त्याप्रमाणे हे झाले ते योग्य झाले.

★

श्रीसाईनाथांचे निष्ठावान सेवक

# कै. म्हाळसापती भगत

— श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅन्शन, ताडदेव रोड,
मुंबई–४०० ००७.



श्री. म्हाळसापती, श्रीसाईबाबा व श्री. भागोजी शिंदे

● श्रीसाईनाथ महाराजांच्या तत्कालीन निकटवर्तियांपैकी त्यांचे निष्ठावान सेवक म्हाळसापती भगत हे एक अलौकिक भक्त होऊन गेले. अत्यंत निःस्वार्थी व वैराग्यवृत्तीने जीवन कंठणाऱ्यांमधे म्हाळसापतींचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. शिरडी क्षेत्राला आजचे पावित्र्य प्राप्त झाले आहे ते श्रीसाईनाथांच्या चरणस्पर्शामुळे हे खरे, परंतु ते आजपावेतो टिकून राहिले आहे व त्याचे माहात्म्य उत्तरोत्तर वाढत गेले आहे ते म्हाळसापतींसारख्या निःसीम भक्तांकडून भक्तीचा डांगोरा पिटला गेला म्हणून !

म्हाळसापती चिमणाजी नागरे हे जातीने तसेच व्यवसायाने सोनार, व पिढीजाद शिरडीचे राहणारे होते. लहानपणापासूनच म्हाळसापती हे श्रीखंडोबारायाचे उपासक

होते. पूर्ववयात ते सोनारकीचा धंदा करीत असत, परंतु तन-मन-धन ईश्वरभक्तिकडे अर्पण केलेले असल्यामुळे त्यांना धंद्यात यश आले नाही व अखेरीस ईश्वरी प्रेरणा होऊन त्यांनी आपला पिढीजाद सोनारकीचा धंदा सोडला व भिक्षावृत्ती स्वीकारली.

यानंतर उर्वरित आयुष्य त्यांनी श्रीखंडेरायाच्या सेवेत घालविण्याचा निर्णय घेतला. त्याशिवाय आपले सहकारी काशिराम शिंपी व आप्पा जागले ह्यांच्या सहकार्याने यथाशक्ति साधुसंत, बैरागी, फकीर, अतिथी ह्यांचा ते आदर सत्कार करू लागले.

अशाप्रकारे आयुष्याची कालक्रमणा चालू असता एकदा राहत्याच्या बाजूने एका मुसलमानाच्या वऱ्हाडाबरोबर श्रीबाबा शिरडीत आले. म्हाळसापती श्रीखंडोबाच्या देवळात पूजा करीत असताना त्या वऱ्हाडातील एक तरुण मुसलमान साधू देवळात आला. तेव्हा मागे वळून सत्कार करताना म्हाळसापती म्हणाले, "आवो साईबाबा" तेव्हापासून 'साईबाबा' हेच नाव त्यांनी धारण केले व आज त्रिभुवनात शिरडी व श्रीसाईबाबा ही नावे प्रातःस्मरणीय झालेली आपण पहात आहोत.

श्रीबाबांच्या प्रथम भेटीच्या ह्या दिव्य क्षणापासून म्हाळसापतींना श्रीसाईबाबांच्या अखंड साठ वर्षांच्या सहवासाचे परमभाग्य लाभले व श्रीबाबांच्या कृपाप्रसादाने त्यांचे सारे जीवन उजळून गेले!

सुरुवातीस श्रीबाबा कित्येक वेळा विक्षिप्तपणे वागत, त्यामुळे हा कोणी वेडा असावा असा काही लोकांचा ग्रह होई, पण म्हाळसापतींसारख्या निष्ठावान भक्तांवर त्याचा काहीही परिणाम होत नसे.

म्हाळसापती श्रीबाबांची रोज पूजा करीत असत. सुरुवातीला श्रीबाबा कपाळाला गंध लावू देत नसत. पण पुढे त्यांनी म्हाळसापतींना एका दृष्टांताद्वारे कपाळाला गंध व हाताला उटणे लावण्याची सुचना केली व तेव्हापासून ती प्रथा चालू झाली.

१० डिसेंबर १९०९ पासून चावडीत श्रीबाबांची समारंभपूर्वक पूजा होऊ लागली. आरती झाल्यानंतर देशपांडे उर्फ 'शामा' चिलीम तयार करून तात्याबांचे हाती देत असत. तंबाखूची ज्वाला निघू लागल्यावर तात्याबा ती चिलीम श्रीबाबांकडे देत. त्यांनी प्रथम झुरका घेतल्यानंतर ती ते म्हाळसापतींना देत. अशा रीतीने चिलीम विझेपर्यंत तिची वर्तुलाकार देवाणघेवाण चालू असे.

श्रीबाबा एक रात्र मशिदीत व एक रात्र चावडीत झोपत असत. तात्याबा व म्हाळसापती हे दोघे श्रीबाबांसमवेत नित्य मशिदीत शयन करीत असत. सर्वत्र

निजानिज झाल्यानंतरही त्या तिघांच्या रात्रभर गोष्टी चालत असत. असा झोपण्याचा क्रम अव्याहतपणे चौदा वर्षे चालू होता.

सुरुवातीला श्रीबाबा हंडीत स्वतःच्या हाताने अन्न शिजवीत व विधीपूर्वक देवदेवतांना नैवेद्य दाखविल्यानंतर पहिल्याप्रथम तात्याबा व म्हाळसापती यांना प्रसाद पाठवीत व मगच ते इतराना वाढण्यास देत.

म्हाळसापतीसारखा निष्ठावान व आज्ञाधारक भक्त विरळाच! श्रीबाबांनी त्यांच्या अनेक प्रकारे कसोट्या घेतल्या, पण म्हाळसापती त्या सर्वांतून यशस्वीरित्या बाहेर पडले. एकदा श्रीबाबांनी तीन दिवस समाधि लावून म्हाळसापतींना आपले शरीर सांभाळण्यास सांगितले होते. म्हाळसापती अहोरात्र तीन दिवस श्रीबाबांचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन बसले होते.

व्यवहाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याकारणाने म्हाळसापतींचा संसार नेहमीच ओढगस्तीचा असे. पण त्याची त्यांनी यत्किंचितही पर्वा केली नाही. सर्व भार श्रीबाबांवर टाकून ते परमार्थात मग्न असत. खुद्द श्रीबाबा रोज शेकडो रुपये वाटीत असत, पण त्यातली एक कपर्दिकही स्वतः म्हाळसापतींना देत नसत, तसेच दुसऱ्यांनी देऊ केलेली मदतही त्यांना घेऊ देत नसत.

भगवान श्रीकृष्णाचा उद्धव, समर्थ रामदासांचा कल्याण, त्याच कोटीतले म्हाळसापती हे श्रीसाईनाथांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांचे चारित्र्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ होते व त्यांनी केलेल्या त्यागाला तोड नव्हती. संसाराकडे लक्ष न देता त्यांनी श्रीबाबांची पाच तपे मनोभावे सेवा केली. ते चांगले अधिकारी गृहस्थ असून पूर्ण निरपेक्ष वृत्तीने राहत. त्यांच्यापासून श्रीबाबांच्या भक्तांना बोध व आनंद नित्य मिळत असे; किंबहूना श्रीबाबांच्या पश्चात् त्यांच्या भक्तांना ते एक विश्रांतिस्थानच होते.

भाद्रपद शके १८४४ मंगळवार दि. १२ सप्टेंबर १९२२ रोजी म्हाळसापती श्रीसाईचरणी विलीन झाले. म्हाळसापतींची समाधि शिरडी येथे त्यांच्या चिरंजीवांच्या मार्तंड महाराजांच्या–राहत्या घरात आहे. देशाच्या दूरदूरच्या भागातून नित्य भक्तमंडळी तिथे येत असतात. म्हाळसापतीच्या निर्याणानंतर श्रीखंडेरायांची व श्रीसाईबाबांची सेवा मार्तंडभक्तांनी तशीच पुढे चालविली आहे. या म्हाळसापतींच्या चिरंजीवांचे वय जवळजवळ शंभरीच्या घरात आहे.

★

# बाबासाहेब, नानासाहेब डेंगळे व निमोणकर

● श्रीसाईबाबा शिर्डीस आल्यावर शिर्डी सोडून फारसे कुठे गेलेच नाहीत. मात्र कधी कधी ते निमगावास आपले मित्र बाबासाहेब डेंगळे यांचेकडे जात व कधी मधी राहत्यास आपले दुसरे एक मित्र चंद्रभानशेट मारवाडी यांचेकडे जात. चंद्रभानशेट वारल्यावर त्यांचे दुकानाचा कारभार खुशालचंदजी पाहात असत. या खुशालचंदजीना महाराज वारंवार बोलावणे पाठवीत व कुणी राहात्याचा माणूस आला की त्याला खुशालचंद भेटला होता का म्हणून विचारीत.

बाबासाहेब डेंगळे व त्यांचे बंधू नानासाहेब डेंगळे हे बाबांचे दोघे मित्र जाळी निमगाव येथे राहात असत. नानासाहेबांना मुलगा नव्हता. प्रथम कुटुंबास मुलगा होईना म्हणून दुसरे कुटुंब त्यांनी केले, तरीसुद्धा काहीएक उपयोग झाला नाही. मग बाबासाहेबांनी नानांना साईबाबांचे दर्शनासाठी पाठविले. साईंच्या दर्शनास नानासाहेब डेंगळे आले तेव्हा साईंनी मुलगा होईल असा आशीर्वाद दिला व योग्य वेळी तो आशीर्वाद फलद्रूप होऊन त्यांना मुलगा झाला. अर्थात त्यामुळे नानांची श्रद्धा साईबाबांवर बसली व ते वारंवार शिर्डीस येऊ लागले.

नाना डेंगळे यांचे सरकारी कामगारांशी बरेच दळणवळण असल्यामुळे त्यांनी सहाजिकच महाराजांचे गुण कामगार मंडळींच्याकडे गायीले; व त्यामुळे लौकरच कलेक्टरांचे चिटणीस चिदंबर केशव उर्फ अण्णासाहेब गाडगीळ काही मंडळींना घेऊन श्रीसाईंच्या दर्शनास आले. पुढे अण्णासाहेब गाडगीळांची महाराजांचे वरील श्रद्धा उत्तरोत्तर वाढत जाऊन ते बाबांचे पूर्ण भक्त बनले.

नानासाहेब डेंगळे ज्या कारणासाठी बाबांच्या दर्शनास प्रथम आले, त्याच कारणासाठी कोपरगावचे मुलकी सर्कल इन्स्पेक्टर गोपाळराव गुंड हे पण दर्शनास आले. त्यांना तीन बायका होत्या. पण एकीलाही मुलबाळ नव्हते. पुढे त्यांनाही बाबांच्या शुभ आशीर्वादाने मुलगा झाला, व ते पण बाबांचे पूर्ण भक्त बनले. गुंड साहेबांच्या मनात एकदा असे आले की, बाबांची मशीद मोडकळीस आली आहे ती आपण पुन्हा बांधवावी. त्यासाठी त्यांनी बरेचसे दगड गोळा केले पण महाराजांनी त्यांना मशीद बांधण्याची परवानगी दिली नाही.

डेंगळे बंधू व गुंड यांच्याप्रमाणेच नानासाहेब निमोणकर हे एक बाबांचे सुरवातीचे भक्त होते. ते संगमनेर तालुक्यातल्या निमोण गावचे देशपांडे. ते तालुक्यातल्या पुढारी गृहस्थात मोडत. सरकारनी त्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमले होते, व हे काम त्यांनी पुष्कळ वर्षे केले. शेवटी वृद्धापकाळ आला म्हणून त्यांनी ते काम सोडले. त्यांचे चुलते शिरडीस राहात त्यामुळे ते कधीमधी शिरडीस येत व आले म्हणजे बाबांच्या दर्शनास जरूर जात. आपल्या आयुष्याच्या अखेरची तीन वर्षे त्यांनी बाबांच्या सेवेत घालविली. साठी उलटून गेली होती तरी त्यांनी महाराजांची अखंड सेवा कधीच सोडली नाही. बाबा त्यांना काका या नावाने हाक मारीत. बाबांच्या पश्चात् ते फार दिवस राहिले नाहीत. त्यांचा अंत उत्तम झाला. शेवटचे तीन दिवस त्यांना जिकडे तिकडे बाबाच दिसत, व जो जवळ येई त्याला ते साईबाबा म्हणत. स्वतःच्या पत्नीलाही ते या साईबाबा असे म्हणत. बाबांच्या अखंड नामस्मरणातच त्यांचा अंत झाला.

# साईनिकेतन येथील रामनवमी उत्सव

● दादर येथील साईनिकेतनमध्ये दर गुरुवारी पुष्कळ साईभक्त दर्शनासाठी येत असतात. यंदा रामनवमी गुरुवारी आल्यामुळे दर्शनार्थी भक्तांची विशेष गर्दी दिनांक ५-४-७९ ला साईनिकेतनमध्ये झाली होती. सकाळी आठ वाजता ऑफीस उघडल्यापासूनच भक्तगण दर्शनास येऊ लागले होते. सकाळी बाबांची पूजा आटोपल्यावर, दादर येथील प्रसिद्ध गवई यशवंत बी. जोशी ह्यांच्या शिष्या सौ. उषाताई जोशी ह्यांचे भक्तिगीत गायन श्री बाबांच्या समोर सकाळी ९-३० ते १२ पर्यंत झाले. गायनाचा कार्यक्रम चालू असतानाच भक्तगण जमत होते व बारा वाजता आरतीला सुरवात झाली त्यावेळी सुमारे दोनशे भक्त उपस्थित होते. साडेबाराच्या सुमारास आरती आटोपली व सर्व भक्तांस उदी व प्रसाद वाटण्यात आला. ऑफिस रात्री ८ पर्यंत उघडे ठेवण्यात आले होते व सबंध दिवसात सुमारे एक हजारावर अधिक भक्तांनी बाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

# श्रीदेवदास, गंगागीर बाबा व आनंदनाथ

श्रीसाईबाबा शिरडीस येण्यापूर्वी तिथे देवदास नावाचे एक साधू पुरुष राहात होते. त्यांची गणना अधिकारी व्यक्ती म्हणून होत असे. रामेश्वर, पंढरपूर व इतर पवित्र क्षेत्राना जाणारे साधुसंत देवदासांना भेटावयास येत असत अशी त्यांची योग्यता होती. साईबाबा देखील सुरुवातीला देवदास स्वामींची वारंवार भेट घेत. बराच वेळ त्या दोघांच्या एकांतात गूढ चर्चा चालत. काही दिवसानी जानकीदास नावाचे दुसरे एक सत्पुरुष शिरडीस आले. त्यांचाही अधिकार फार मोठा होता. कारण बाबा स्वतः त्यांच्या भेटीला गेले आणि त्यांना आपल्या निवासस्थानी घेऊन आले. पुढे बरेच दिवस ते आणि बाबा गूढ ज्ञानाविषयी वादविवाद करीत असत. एकदा कोपरगावनजिक असलेले पुणतांबे येथील एक संत गंगागीर महाराज शिरडीस आले. नित्य नियमांप्रमाणे साईबाबा निंब वृक्षाजवळील जागेत दोन्ही हातात पाण्याने भरलेल्या मातीच्या घागरी घेऊन झाडांना पाणी घालीत होते. ते पाहून गंगागीर महाराजांनी एकदम आश्चर्य प्रकट केले व जवळ असलेल्या गावकरी मंडळींना ते म्हणाले, " अरे ! ही मूर्ति येथे कधी आली ? हे अत्यंत बहुमोल रत्न आहे. यांची योग्यता फार मोठी आहे. धन्य, धन्य ! भाग्य त्या शिरडीचे ! हा मनुष्य आज पाणी भरीत आहे तरी तो सामान्य माणूस नाही. तुम्ही फार नशीबवान आहात. तुमच्या पूर्वजन्माची पुण्याई म्हणूनच हे अमोल रत्न येथे आले आहे. " गंगागीर महाराजांच्या तोंडून निघालेले हे उद्गार ऐकून साईबाबांची योग्यता किती मोठी आहे हे समजून त्यांनी बाबांना रत्नाची उपमा दिली. यामुळे शिरडीकरांना बाबांच्याबद्दल प्रेम व आदर आणखीन वाटू लागला. बाबांची माहिती व सुकीर्ती शिरडीच्या परिसराबाहेर पसरू लागली व दूरदूरचे भाविक भक्त सहज स्फूर्तीने बाबांच्या दर्शनाला धावत येऊ लागले. पुढे काही दिवसांनी अक्कलकोट महाराजांचे शिष्य महंत आनंदनाथ हे मुद्दाम बाबांच्या भेटीला शिरडीस आले. ते येवल्याजवळ सावरगाव येथे एकदा गेले असता शिर्डीचे माधवराव बळवंत देशपांडे उर्फ शामा, दगडू भाऊ गायके, नंदराम शिवराम मारवाडी, भागचंद मारवाडी त्यांचे दर्शनाला गेली होती. दर्शन झाल्यावर ही मंडळी शिर्डीस यावयास निघाली तोच आनंदनाथ महाराज एकाएकी धावत येऊन त्यांचे गाडीत बसले व म्हणाले, मी तुमच्याबरोबर येतो. नेवरगावच्या व येवल्याच्या मंडळींनी महाराजांना अडविण्याचा प्रयत्न केला पण तो व्यर्थ गेला. आनंदनाथ महाराज जेव्हा शिरडीस आले तेव्हा त्यांनी महाराजांचे दर्शन करताना उद्गार काढले, " हा हिरा आहे. याची खरी किंमत तुम्हाला नाही.

हा जरी उकिरड्यावर असला तरी प्रत्यक्ष हिरा आहे हे ध्यानात ठेवा." यावेळी महाराज प्रसिद्धीस आले नव्हते व गावातले लोक त्यांना एक साधारण किंबहुना वेडा फकीर समजत असत.

महाराजांची स्थिती या वेळेला, "फाटके तुटके नेसतो रे। मन मानेल तेथे बसतो रे॥ वेड्या वेड्यापरि दिसतो रे। परी ब्रम्हांड गिळूनी असतो रे॥" अशी होती. महाराज कधी ओढ्यावर जाऊन बसत, कधी गावकुसाजवळ असलेल्या एका लिंबाच्या झाडाखाली बसत, कधी कुणाच्या मळयात जाऊन बसत, अंगावरील कपडे त्यांचे फाटके असत, तर कधी कधी ते उग्ररूप धारण करीत. या व अशाच वर्तनामुळे साधारण जनसमाजाला ते वेडेच वाटत. पण लौकरच लोकांचा भ्रम दूर झाला व बाबांची योग्यता शिर्डीच्या लोकांना कळून आली.

★


## साईभक्तांनो सावधान!

श्री साईबाबा संस्थान शिरडीतर्फे कोणत्याही प्रकारच्या किंवा कोणत्याही स्वरूपातल्या देणग्या साईभक्तांकडून घेण्यासाठी कुणाही अधिकृत व्यक्तीला नेमण्यात आलेले नाही किंवा कुणालाही तशी परवानगी देण्यात आलेली नाही. कुणाही साईभक्ताने अशा प्रकारे देणग्या वस्तू दिल्यास व त्या बाबतीत पोच पावती न मिळाल्यास श्री साईबाबा संस्थान शिरडी जबाबदार रहाणार नाही. ज्या भक्तांना देणगी, भेट इ. श्री बाबांना द्यायचे असेल त्यांनी श्री. कोर्ट रिसिव्हर साहेब, श्री साईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, जि. अहमदनगर ता. कोपरगाव येथे पाठवावी किंवा स्वतः येऊन द्यावी.

# बाबांचा नित्यक्रम

— द. शं. टिपणीस

बाबा पहाटे उठून धुनीपाशी बसत, काही वेळाने शौचविधि उरकत व स्वतःच सर्व साफ करीत, नंतर स्वस्थ बसत, तेव्हा भागोजी शिंदे येई. महाराजांच्या उजव्या हाताला पट्टे असत. भागोजी ते पट्टे सोडी, हात चोळी व सर्व अंग दाबी. पुन्हा पट्टे बांधी. नंतर चिलीम भरून स्वतः ओढून बाबांना देई. बाबा ती ओढून परत भागोजीकडे देत. असे ५-६ वेळा झाल्यावर भागोजी जाई. भागोजी महाव्याधिग्रस्त होता तरीही ही सर्व सेवा बाबा त्याच्याकडून करवून घेत. नंतर महाराज स्वस्थ बसत. या वेळी भक्त मंडळी येऊ लागत. आलेली मंडळी बाबांची सेवा करीत. सेवा करताना चौकशी गप्पा चालत. काही वेळाने बाबा तोंड धूत. तोंड धुण्यास त्यांना भरपूर पाणी लागे. हातावर, पायावर, तोंडावर, कानावर पाणी ओतून हे सर्व अवयव अत्यंत नाजूकपणे ते चोळचोळून स्वच्छ करीत. तोंड धुणे झाल्यावर गावात ठराविक पाच ठिकाणी भिक्षेला जात व माशिदीत परतत, आल्यावर थोडेसे खाणे होई, नंतर काही वेळ बैठक होई. यावेळी बरीच भक्त मंडळी जमत. भक्तांशी गप्पा' त्यातून बोध, गोष्टीरूपाने शिकवण, अधूनमधून विनोद तर मध्येच रागावणे. लगेच शांत होणे. या सर्वात बाबांची काही ना काही मेख असावयाची. भक्तमंडळी बैठकीत रंगून जात. प्रत्येकाला काही ना काही मार्गदर्शन लाभे. बैठक चालू असता बाबा कधी कधी पेरु, केळी, आंबे विकत घेत व ते सर्व मंडळीना वाटून टाकत. बैठकीनंतर बाबा लेंडीवर जात. तेथे ते एक तास असत, परत आल्यावर तिसरे प्रहरपर्यंत (दुपारी २ पर्यंत) बाबा मशिदीतच असत. या वेळात पूजा, आरती, जेवण होई. नंतर पुन्हा लेंडीवर जात. तेथे पाऊण तास थांबत व परत येत. मग संध्याकाळपर्यंत मशिदीतच असत. संध्याकाळी थोडे बाहेर जात पण लगेच परत येत. दिवसातून तीन वेळा बैठकी होत. न्याहारीनंतर, लेंडीवरून परत आल्यावर व संध्याकाळी ठराविक व्यक्तिखेरीज इतरांना रात्री मशिदीत येण्याची परवानगी नसे. तसेच रात्री मशिदीत वाद्ये वाजवण्यास बंदी असे. बाबा मशिदीत असले तर गोकुळ अष्टमीचा रात्रीचा कार्यक्रम चावडीत होई.

साईसच्चरित्रकार

# गोविंदराव दाभोलकर उर्फ 'हेमाडपंत'

— डॉ. गजाननराव गोविंदराव दाभोलकर,
'साईकृपा,' सेंट मार्टिन्स रोड, वांद्रा, मुंबई ५१

卐  卐

● साईसच्चरित्रकार कै. गोविंदराव रघुनाथराव प्रभु दाभोलकरांचा जन्म कुडाळ प्रांतातील दाभोली गावच्या भारद्वाज गोत्री घराण्यात झाला. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे व सामाजिक आपत्कालामुळे गोविंदरावजींचे वडील ठाणे जिल्ह्यातील केळवे माहिम येथे येऊन राहिले व तेथेच सन १८५९ साली (मार्गशीर्ष शुद्ध ५

रोजी) गोविंदरावांचा जन्म झाला. ते जात्याच कुशाग्र बुद्धीचे, पण तत्कालीन कौटुंबिक परिस्थितीमुळे त्यास मनासारखे शिक्षण घेता आले नाही. केळवे-माहीम येथे मराठी शिक्षण झाल्यावर त्यास त्यांच्या वडील बंधूनी पुणे येथे इंग्रजी शिक्षणासाठी ठेविले. त्या वेळच्या पब्लिक सर्विस परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर त्यांस अभ्यासक्रम सोडून केळवे माहीम येथे द. म. ८/ रु. वेतनावर शाळेतील शिक्षकाची नोकरी पत्करावी लागली. पुढे कुलाबा जिल्ह्यात तलाठ्याचे जागेवर त्यांची नेमणूक झाली. ह्या जागी त्यांची हुशारी जिल्ह्याच्या कलेक्टरच्या नजरेस आल्यामुळे त्यांनी आपल्या कचेरीत त्यास द. म. २५/ रु. पगारावर कारकून नेमले. तेथे मुल्की खात्याची परीक्षा पास झाल्यावर त्यांची महाड येथे अव्वल कारकुनाचे जागी नेमणूक झाली. त्यावेळचे कलेक्टर सिंक्लेअर यांची गोविंदरावांच्या चोख दक्षतेच्या कामामुळे त्यांजवर मर्जी बसली. पुढे त्या साहेबांची बदली ठाण्याच्या कलेक्टरच्या जागी झाल्यावर त्यांनी गोविंदराव यांस तिकडे बदलून घेऊन फॉरेस्ट सेटलमेंटच्या कामावर नेमले. नंतर त्यांची भडोच येथे दुष्काळाच्या कामावर नेमणूक झाली व सन १९०१ साली शहापूर येथे मामलेदाराच्या जागेवर त्यांची कायमची नेमणूक झाली. सन १९०३ ते १९०७ पर्यंत त्यांनी वांद्रे येथे फर्स्ट क्लास रेसिडेंट मॅजिस्ट्रेटचे काम केल्यावर पुढील तीन वर्षांत मुरबाड, आनंद, बोरसद या गावी बदल्या झाल्या व सन १९१० साली पुन्हा वांद्रे येथे रेसिडेंट मॅजिस्ट्रेटच्या जागी आल्यावर त्याच ठिकाणी १९१६ साली ते सेवानिवृत्त झाले.

गोविंदरावजींच्या घराण्यात ईश्वरभक्ती हा गुण अनुवंशिक आहे. त्यांचे पितामह उत्तरेस श्रीबद्रीनारायणाच्या दर्शनास गेले ते परत आलेच नाहीत. त्यांचे वडील शिवभक्त होते. हाच गुण गोविंदरावामध्ये आला. विशेषतः श्रीमारुतीच्या उपासनेकडे फार ओढा होता. ही त्यांची ईश्वरभक्ती हळूहळू वाढत गेली. मोठेपणीही अधिकारप्राप्तीमुळे बेहोष होऊन देवधर्मास न लाथाडता, आपल्या ब्राह्मणोचित परंपरागत वहिवाटीप्रमाणे स्नानसंध्या करून गुरुचरीत्र, एकनाथी भागवत, रामायण, उपनिषदे, भगवद्गीता वगैरे धार्मिक ग्रंथांचे पठण करण्याचा त्यांचा नित्य परिपाठ असे. अशा त्यांच्या ईशभक्तीत रंगलेल्या मनाला योग्य मार्ग दाखविणाऱ्या सद्‌गुरूची गाठ सन १९०९ साली पडली. हे सद्‌गुरु म्हणजेच शिर्डी येथील प्रसिद्ध सत्पुरुष श्रीसाईबाबा होत. श्रीसाईबाबांवर त्यांची फार श्रद्धा व बाबांची देखील त्यांच्यावर इतकी कृपा होती की बाबांनी त्यांचे नाव "हेमाडपंत" ठेवून त्यास आपले चरित्र लिहिण्यास सांगितले. हे चरित्र गोविंदरावजींनी ५१ अध्यायात ओवीवृत्तात ग्रंथित केले आहे व आश्चर्याची गोष्ट ही की त्यांनी त्याचा ५१ वा

अध्याय पुरा करून ग्रंथाची समाप्ती केल्यानंतर दोनच दिवसात त्यांच्या आयुष्य-ग्रंथाची पण समाप्ती झाली. ओवी वृत्तातील हे चरित्र इतके उत्तम लिहिले आहे की ते वाचताना आपण दोन–तीनशे वर्षापूर्वीच्या एखाद्या संतकवीने लिहिलेला ग्रंथच वाचीत आहोत असे वाटते. ह्या त्यांच्या लेखन कौशल्याबद्दल रा. ब. चिंतामणराव वैद्यांसारख्यांनीही त्यांची प्रशंसा केली आहे. सन १९१६ साली सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांनी आपले आयुष्य परमार्थ विचारात ईश्वरभक्तीत घालविले.

गोविंदरावांचे परोपकाराकडे लक्ष लहानपणापासून होते. पुढे नोकरी लागल्यावर आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांनी गरीबास मदत केली. भडोच येथे दुष्काळी कामावर त्यांची नेमणूक झाल्यावर त्यांच्या आवडीचेच काम त्यांस मिळाले व त्यामुळे गरीबांस अन्न वाटण्याचे काम ते फार कळकळीने करीत; विशेषतः पूर्वी सधन असलेले पण दुष्काळामुळे गरीब झालेले असले तरी अन्नासाठी हात पसरणे कमीपणाचे समजून मागण्यास न येणारे लोक शोधून काढून त्यांच्या घरी स्वतः जाऊन ते त्यांस मदत पोहोचवित असत. हे यथाशक्ति परोपकार करण्याचे व्रत त्यांनी शेवटपर्यंत चालविले होते.

अशाप्रकारे कै. गोविंदराव यांनी स्वतःच्या कर्तबगारीने नावलौकिक संपादन करून त्याबरोबरच प्रपंच व परमार्थ ही साध्य केली. त्याकाळी त्यांच्या सुशील पत्नी, पाच कन्या व एक चिरंजीव असे त्यांचे कुटुंब होते. दैव थोर की कर्तृत्व थोर या विषयावर श्रीबाबांच्या काळी जो त्यांनी वाद आरंभिला होता, त्यातील कर्तृत्व थोर असल्याचे त्यांनी लोकांना पटवून दिले. कारण त्या कर्तृत्वाच्या जोरावरच त्यांनी जो बहुमान मिळविला आहे तो अवर्णनीय आहे. ता. १५ जुलै १९२९ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी वांद्रे येथे गोविंदरावजी स्वर्गवासी झाले.

●

'यंदाचे वर्षी गुरुपौर्णिमा (आषाढ शु. १५) दि. ९–७–७९ सोमवार रोजी आहे. उत्सव दि. ८–७–७९ ते १०–७–७९ (रविवार, सोमवार, मंगळवार) असे तीन दिवस असून मुख्य दिवस दि. ९–७–७९ (सोमवार) आहे.

# सॉलिसिटर कै. काकासाहेब दिक्षित

— प्रा. र. श्री. पुजारी,
९१२, रमानिवास, सदाशिव पेठ, पुणे

● कै. हरी सीताराम दीक्षित हे श्रीबाबांच्या काळातील मुंबईतील एक प्रख्यात सॉलिसिटर. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा वरदहस्त त्यांच्या मस्तकावर असलेला. त्यामुळे पुढारीपणाची माळ त्यांच्या गळ्यात येऊन पडलेली. अशी प्रतिष्ठित, ऐश्वर्यसंपन्न व्यक्ती ऐहिकावर तुलसीपत्र ठेवून श्रीबाबांसारख्या एका वेड्या समजल्या जाणाऱ्या फकिराच्या ध्यानी–भजनी लागावी हे त्या काळातील एक मोठेच आश्चर्य.

पण आश्चर्य तरी कसले? सिद्धार्थासारख्या सकल ऐश्वर्ये पायी लोळण घेत असलेल्या राजपुत्राने आत्मोधारार्थ गृहदारादिकांचा त्याग एका क्षणात केला. श्री. काकासाहेब दीक्षितांचेही असेच झाले. ऐहिक ऐश्वर्याचा सूर्य माथ्यावर येऊन तळपत असतानाच त्यांच्या अंतःकरणात अशांतीचा काळोख दाटला. जीवन नकोसे वाटू लागले. अशा वेळी परम गुरुभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर यांनी श्री. काकासाहेब दीक्षित यांची लोणावळ्यास त्यांच्या बंगल्यात भेट घेतली. ही भेट श्री. काकासाहेब दीक्षितांचे सर्व जीवनच पालटून टाकणारी ठरली.

वस्तुतः श्री. काकासाहेब धर्मशील, दयाशील, गडगंज ऐश्वर्य लाभूनही विनयशील. भारतातील सर्व तीर्थयात्रा त्यांनी केलेल्या. तीर्थस्थानी ब्राह्मणभोजने घातलेली. व्रते, दाने, अनुष्ठाने यांच्यापायी मुक्तहस्ते खर्च केलेला. मग ही अशांती त्यांच्या अंतःकरणात का दाटावी? एखाद्या राक्षसीप्रमाणे रात्रंदिवस मानगुटी का बसावी?

गुरुकृपेविना सर्व व्यर्थ हे तत्त्व श्री. काकासाहेबांना माहित असले तरी अद्याप त्यांच्या आचरणात नव्हते. नेमकी ही उणीव श्री. नानासाहेब चांदोरकर यांनी जाणली. सद्गुरूंच्या घराची वाट श्री. नानासाहेबांनी त्यांना दाखविली.

तथापि श्री. नानासाहेबांना उंच पहाड चढून, लोणावळ्यास त्यांना श्री. काकासाहेबांच्या हवेलीवर पोचवून, शिरडीस येण्याची गळ घालण्यापासून तो शिरडीत त्यांना श्रीबाबांच्या चरणी घालीपर्यंतची सर्व योजना श्रीबाबांचीच होती असे दिसते. कारण पहिल्याच भेटीच्या वेळी श्रीबाबा त्यांना म्हणाले, " तुझी वाट पाहिली पाहिली आणि विचार केला : आता या शाम्यासच थेट नगरास पाठवावा. "

मागे लंडन शहरी असताना श्री. दीक्षितांच्या पायास दुखापत झाली होती. सर्व देशी-विदेशी डॉक्टर-वैद्य हकीम करूनही ती बरी होईना. जन्माचे हे एक दुखणे होऊन बसले. श्री. दीक्षित पंगू झाले. परावलंबी होऊन पडले. तरी पुढारीपणाचा मुरलेला अहंकार त्यांना घरी स्वस्थ बसू देईना. धारासभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने ते नगरास आले. शिरडीच्या जवळपासच्या परिसरात आले. मग मात्र त्यांना राहा-वेना. श्रीबाबांच्या दर्शनाची ओढ त्यांच्या मनास लागली. हळूहळू ती तीव्र झाली. नेमक्या याच क्षणी काही निमित्त काढून श्रीबाबांनी शामास नगरास पाठविले. श्री. दीक्षितांना हात देऊन, गाडीत रात्रभर श्रीबाबांच्या लीलांच्या संकीर्तनात त्यांना रमवून सकाळी त्यांना शिरडीस आणले. हे सर्व करुणावात्सल्य श्रीबाबांचेच. कारण श्रीबाबा पुढे एक दिवस म्हणाले, "माझा भक्त कोठेही सातासमुद्रापलिकडे असो–चिमणीच्या पायाला दोरा घालून आणावे तसा मी त्याला माझ्याकडे ओढून आणीन."

श्री. दीक्षितांना श्रीबाबांनी खरोखरच उंच हवेलीमधून बाहेर काढून स्वतःकडे ओढून आणले.

पण यालाही काही विशेष कारण असले पाहिजे. अमुक जन्मात, अमुक साधु-पुरुषाशी तुझी भेट होईल आणि त्यानंतर जीवनमुक्तीचे द्वार तुला उघडेल असा जणू त्यांना वर असावा त्याप्रमाणे सर्व घडले.

श्री. दीक्षित म्हणजे भावार्थाची केवळ मूर्ती. श्रीबाबांसमोर एखाद्या निरागस बालकाप्रमाणे ते बसत. श्रीबाबांचा शब्द एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे मानीत. जणू आजवर जे ग्रंथ त्यांनी उराशी बाळगले त्यातील सर्व विचार ते विसरले. मन कोऱ्या पाटीप्रमाणे स्वच्छ पुसून श्रीबाबांकडे आले.

अज्ञ बालकाची ही विनम्र भूमिका श्री. दीक्षितांनी कधीही सोडली नाही. श्रीबाबांनीही त्यांना या लोभस भूमिकेमधून कधी बाहेर ओढले नाही. श्रीबाबा श्री. दीक्षितांना काका म्हणत. पण 'लंगडा' हे विशेषण घालूनच. श्री. दीक्षितांना ते काका म्हणत. कधी 'बंड्या' या आवडत्या टोपण नावानेही ते दीक्षितांचा उल्लेख करीत. श्री. दीक्षितही स्वतःस "श्रीबाबांचे लाडके लेकरू" म्हणवीत. स्वतःची सही करतानाही हे बिरुद ते मोठ्या अभिमानाने मिरवीत.

धन, प्रतिष्ठा, विद्वत्ता यावर श्री. दीक्षितांनी तुलसीपत्र ठेवले म्हणूनच श्रीबाबांचे ते इतके लाडके झाले. ज्ञान, भक्ती, वैराग्य यामुळे श्रीसाई दरबारात नवरत्नांपैकी रत्न असे झळकले. पण त्या आधी त्यांनी जी लोकनिंदा सहन केली तिला तोड नाही. समाजात कुचेष्टा होऊनही त्यांनी सद्‌गुरूंचे पाय सोडले नाहीत.

शिरडीस प्रथम आले तेव्हाच श्रीबाबांना ते म्हणाले, "सद्‌गुरो! या नश्वर देहाचे काय! माझ्या मनाचे लंगडेपण घालवा."

श्रीबाबांनी श्री. दीक्षितांना अत्युच्चपदी बसविले. कळसास नेऊन पोचविले, पण त्या आधी श्रीबाबांनी त्यांना आपल्या गरजेनुसार घडविले. अनेक प्रसंगी त्यांची परीक्षाही पाहिली. त्यापैकी एकदा तर एकादशीच्या पवित्र दिवशी एका आजारी, केवळ मरणोन्मुख बकरीची हत्या करण्याची आज्ञा त्यांना झाली. पण फुलाहूनही कोमल अंतःकरणाचे श्री. दीक्षित डगमगले नाहीत. सद्‌गुरूंची आज्ञा मोडणे हेच पाप या श्रद्धा भावाने बकरीच्या मानेवर सुरी चालविण्यासही ते तयार झाले!

श्री. दीक्षित श्रीबाबांच्या आज्ञेनुसार नित्य श्रीएकनाथी भागवताचे आणि भावार्थ रामायणाचे वाचन करीत. हरीलीला श्रवणात आणि ध्यानधारणेत रंगून जात. तथापी आपल्या अंतकाळी आपणास कोणते दुःख कर्मगतीप्रमाणे भोगावे लागेल या विचाराने ते कधी कधी अस्वस्थ होत. अशा एका प्रसंगी श्रीबाबा अभय देऊन त्यांना म्हणाले, "काका, तुझ्या अंतकाळाची काळजी का करतोस? मी तुला एखाद्या फुलाप्रमाणे विमानातून नेईन."

आणि खरोखरच बोलता बोलता, हरिचिंतनी रंगता रंगता बसल्या जागी त्यांची प्राणज्योत शांत झाली.

त्या दिवशी म्हणजे ५ जुलै १९२६ रोजी पारले ते मुंबई असा रेल्वे प्रवास करीत असताना स्नेही श्री. आण्णासाहेब दाभोळकर यांच्या खांद्यावर श्री. दीक्षितांनी आपली मान टेकविली. दुसऱ्या क्षणी श्री. अण्णासाहेब दाभोळकर पाहतात तर श्री. दीक्षितांची प्राणज्योती मालविलेली होती.

हरिभक्तांचे देहावसान हरिदिनीच घडावयाचे. जुने भक्त अप्पा कुलकर्णी आणि काशिराम शिंपी यांचे देहावसान एकादशीस घडले. श्रीबाबांचे देहावसानही एकादशीसच घडले. श्री. दीक्षित याला अपवाद नव्हते. श्री. दीक्षितांचे देहावसान जेष्ठ वद्य एकादशीस झाले.

त्या दिवशी शिरडीस दोन चमत्कार घडले. लेंडी बागेत श्रीबाबा ज्या लिंबांच्या झाडाखाली बसत त्याची मधली एक मोठी फांदी अचानक मोडून पडली. दुसरी अशीच घटना म्हणजे द्वारकामाईवरील तीन कळसापैकी एक कळस अचानक मोडून पडला.

श्री. दीक्षितांच्या देहावसानामुळे सर्वसाक्षी भक्तवत्सल श्रीबाबांनी केलेला हा शोकच होय.

❋

# साईभक्त श्रीकाकासाहेब दिक्षित



श्री. हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे श्रीसाईबाबांचे एक निस्सीम भक्त होते. त्यांनी आपल्या उतार वयात बाबांचे शिष्यत्व पत्करून आपली अध्यात्मिक उन्नती करून घेतली होती.

श्री. काकासाहेबांचा जन्म इ. स. १८६४ मधे खांडवा येथे वडनगरा नागर ब्राम्हण कुळात झाला होता. काकांचे वडील बंधू रावबहादूर राजाराम सीताराम दीक्षित हे नागपूरातील एक नामांकित नागरिक होते. ते कर्तबगार कंत्राटदार होते व त्यांनी मिळविलेल्या लौकिकामुळे सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही बहुमानाची पदवी दिली होती. ते ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. त्यांचे दोन्ही पुत्र मोतीभाऊ व मोरुभाऊ बॅरिस्टर होते. पण ते दोघेही अकाली मरण पावले. काकासाहेबांचे धाकटे बंधू सदाशिवराव हे बी. ए. एल. एल. बी. होते. ते कच्छ संस्थानचे दिवाण होते.

काकासाहेब दीक्षितांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण खांडवा, हिंगणघाट व नागपूर येथे झाले. इ. सन १८७८ म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी ते नागपूरच्या सिटी हायस्कुल मधून मॅट्रीक्युलेशन परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले व त्यांनी दोन शिष्यवृत्या मिळविल्या नंतर मुंबईच्या विल्सन महाविद्यालयातून पी. इ. पास झाल्यावर ते एलफिन्स्टन महाविद्यालयात गेले व तेथून १९ व्या वर्षी बी. ए. ची. परीक्षा उत्तीर्ण झाले, व त्यांनी धीरजलाल मथुरादास शिष्यवृत्ती मिळविली. नंतर एल. एल. बी. चा अभ्यास केला. सॉलिसिटरची परीक्षा त्यांनी दिली. काही दिवस गव्हर्नमेंट सॉलिसिटर्सतर्फे लिटल कंपनीत काम केल्यावर त्यांनी आपली स्वतंत्र सॉलिसिटर्सची पेढी उघडली. त्यामुळे त्यांनी खांडवा, नागपूर सोडून मुंबईस विलेपारले येथे आपला कायम निवास केला. एक हुषार नामांकीत सॉलिसिटर म्हणून इंग्रज-

काळात ते प्रसिद्धीला आले. काकासाहेब हे नागर ब्राम्हणातले पहिले सॉलिसिटर होत. महाराष्ट्र ब्राम्हणात पहिले सॉलिसिटर म्हणून रावबहादूर धोंडो शामराव गरुड यांचे नाव त्यावेळी घेतले जात असे. भावनगर एक्सपोझर्स, पुणे वैभव वरील राजद्रोहाचा खटला, लो. टिळक व ग्लोब, लो. टिळक व टाईम्स ऑफ इंडिया, जी. आय. पी. (सेंट्रलरेल्वे) रेल्वेच्या सिग्नलर्स लोकांनी केलेला संप इत्यादींचे महत्वाचे खटले काकासाहेबांनीच चालविले त्यामुळे त्यांचे नाव खूपच गाजले. पुढे काकांनी सार्वजनिक कार्यातही पडण्याचे ठरविले. १८९६ साली गिरगाव वॉर्डतर्फे ते मुंबई म्युनिसिपल कारपोरेशनच्या निवडणूकीस उभे राहिले व यशस्वीपणे निवडून आले. तत्कालीन पालिकेच्या कितीतरी समित्यांवर त्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. कारपोरेशनमधेही त्यांनी चांगला लौकीक मिळविला. काकांची कर्तबगारी, काम करण्याची हातोटी व सचोटी, निरलसता, स्पष्टवक्तेपणा इ. गुण त्यावेळचे भारताचे सिंह नामदार सर फेरोजशहा मेथा यांना दिसून आली आणि म्हणूनच की काय त्यांनी काकांना आपल्या अनुयायात सहभागी करून घेतले. नेमस्त राजकारण काका फेरोजशहांचे पासून शिकले. मुंबई विद्यापीठाचे ते फेलो होते. तसेच दि इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे (राष्ट्रीय सभा) ते एक महत्वाचे घटक होते. तसेच मुंबई सरकारी कौन्सीलचे सभासद होऊन नामदार दिक्षित या नावाने खूप प्रसिद्धीस आले. पुढे परमार्थाकडे त्यांचे मन वळले नसते तर काकासाहेब आणखीन खूप पुढे गेले असते. गृहस्थाश्रमात त्यांनी चारीधाम यात्रा केल्या, व १९०६ साली विलायतेची पण सफर केली. श्रीसाईनाथ महाराजांशी त्यांचा निकट संबंध आला व ते त्यांच्या चरणी रमले ते कायमचेच. शिरडीस ते वानप्रस्थ झाले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे काका दरदिवशी सकाळी एकनाथी भागवत वाचत असत व रात्री भावार्थ रामायण नित्यनेमाने वाचत. साईनाथांच्या बरोबरचा त्यांचा सहवास असलेली काकांची रोजनिशी प्रसिद्ध आहे. काकासाहेबांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई. त्या काकांच्या अगोदर निर्वतल्या. काकांना रामकृष्ण व बाळकृष्ण असे दोन पुत्र व एक कन्या एवढी अपत्य संपदा होती. शिर्डी संस्थानचे काका एका काळी चिटणीसपदावर होते. शिरडी संस्थान स्थापन झाल्यापासून ते चिटणीस होते. जेष्ठ वद्य एकादशी शके १८४८ म्हणजेच ५ जुलै १९२६ रोजी विलेपारले ते चर्नीरोड असा आगगाडीतून प्रवास करीत असताना गाडीतल्या गाडीतच लोअरपरळ स्टेशनवर त्यांची हृदयक्रिया बंद पडली व त्यांचे देहावसान झाले. निधन समयी त्यांचे वय ६२ वर्षाचे होते. मृत्युच्या दिवशी प्रवास करीत असताना त्यांचे बरोबर श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर उर्फ आण्णासाहेब (हेमाडपंत) त्यांचे बरोबर होते.

# डेप्युटी कलेक्टर हरी विनायक साठे

—श्री. र. श्री. पुजारी, पुणे ३०

● श्रीसाईदरबारात ज्ञान–भक्ती–वैराग्य यामुळे रत्नांप्रमाणे तळपणाऱ्या दोन व्यक्तीमुळे—श्री. नानासाहेब चांदोरकर आणि श्रीदासगणू–यांजमुळे शिरडीकडे भक्तांची रीघ लागली. त्यात मोठमोठे अंमलदारही होते. ही सर्व मंडळी शिरडी-सारख्या खेड्यातील सर्व गैरसोयी सोसून राहात. जुन्या चावडीत, जुने भक्त श्री. गणेश दामोदर ऊर्फ दादा केळकर यांच्या किंवा माधवराव देशपांडे ऊर्फ शामराव यांच्या घरी उतरत. स्नान, जेवणखाण वगैरे तेथेच करीत. परंतु ही व्यवस्था पुढे अत्यंत अपुरी पडू लागली. अशा वेळी पुण्याचे एक भक्त रावबहाद्दूर हरी विनायक साठे यांना शिरडीस भक्तांना उतरण्यासाठी एक वाडा बांधण्याची श्रीबाबांची आज्ञा झाली. श्री. साठेसाहेब नगर जिल्ह्यात त्यावेळी डेप्युटी कलेक्टर होते.

श्री. साठेसाहेब श्रीबाबांच्या दर्शनासाठी शिरडीस प्रथम आले तेव्हा विधुर होते. कुटुंब निवर्तल्यासही पुष्कळ दिवस होऊन गेले होते. फिरून लग्न करण्याची इच्छा नव्हती. तरीही त्यांच्या प्रेमळ स्नेह्यांचा त्यांनी विवाह करावा म्हणून आग्रह पडला. याला एक महत्त्वाचे कारण होते. ते म्हणजे श्री. साठेसाहेबांना पुत्रसंतती नव्हती.

श्री. साठेसाहेब धर्मनिष्ठ, कुळाचारावर श्रद्धा असलेले पुत्राविना कुळाचार खन्डित होणार; श्री. साठेसाहेबांची मनःस्थिती द्विधा झाली. शेवटी या पेचातून एक मार्ग निघाला तो असा की शिरडीस जावे. तेथे श्रीबाबांची आज्ञा होईल त्याप्रमाणे करावे.

पुढे श्रीबाबांच्या आज्ञेवरून श्री. दादा केळकर यांची कन्या श्री. साठेसाहेबां-साठी नियोजित झाली. तिला श्रीबाबांनी स्वतःच्या हाताने कुंकू लावले. एक खर्बुज तिच्या ओटीत घातले. म्हणाले, "जा. तुला मुलगा होईल."

पुढे काही दिवसानी श्रीबाबांच्या सूचनेवरून श्री. बाबासाहेब यांनी उखरीची जागा निंबासकट खरेदी केली. निंबवृक्षातली श्रीबाबांची जुनी बैठक, श्रीबाबांच्या गुरूंचे हे स्थान म्हणून या पवित्र निंबवृक्षास पारकट्टा बांधवून घेतला. मग त्या जागी भक्तांना निवांतपणे रहाता येईल असा प्रशस्त वाडा बांधला.

मूळातील उखरीची ही जागा. या जागी एक बाग होती. ती स्वतः श्रीबाबांनी दगडगोटे वेचून, वामनतात्यांच्या मातीच्या घागरीनी दिवसभर पाणी ओतून,

खपून केली होती. त्या बागेतील फुलझाडांऐवजी आता एक सुंदर वास्तू उभी राहिली.

परंतु या वाड्यास वास्तू म्हणण्याऐवजी मठ म्हणणेच अधिक शोभून दिसेल. या वाड्यात हरिनाम, हरिगुणगान याविना अन्य काहीच उरले नाही. कारण श्रीबाबांची श्रीज्ञानेश्वरी, श्रीएकनाथी भागवत, श्रीभावार्थ रामायण, श्रीहरिवरदा, श्रीगुरुचरित्र हे नेमून दिलेले ग्रंथ भक्तानी तेथे दुपारी वाचण्याची आणि त्यांचे निरुपण करण्याची सक्त आज्ञाच असे.

श्री. अण्णासाहेब दाभोलकर या साठेवाड्यास भक्तांचा 'आरवाडा' या नावाने गौरवितात. भक्तांनी श्रीबाबांच्या कार्याच्या सर्व योजना या वाड्यात बसूनच आखल्या. खेडा जिल्ह्यात डेप्युटी कलेक्टर असताना श्री. साठेसाहेब यांना नोकर म्हणून लाभलेला व पुढे परम साईभक्त म्हणून गौरविण्यात आलेला मेघा या साठे वाड्यातच राहात असे. तेथेच श्रीबाबांनी निष्पाप मेघावर बहुमोल कृपाप्रसाद केला.

गुरूस्थानाच्या आणि निंबवृक्षाच्या रूपाने साक्षात् श्रीबाबाच श्री. साठेसाहेब यांच्या वास्तूत कायमचे राहायला आले. श्रीद्वारकामाईने, श्रीसमाधिमंदिर यांच्या इतकेच पावित्र्य साठेवाड्याच्या परिसरास लाभले.

श्री. साठेसाहेबांच्या बेचाळीस कुळातील गुरूभक्तांनी जे तप केले ते श्रीबाबांच्या या कृपाप्रसादामुळे श्री. साठेसाहेब यांच्या पिढीस लाभले. श्री. साठे साहेबांच्या लौकिक चरित्रावरील ही दिव्य पताका होय.

## श्री. सदानंद चेंदवणकर यांना

### साईधामकडून बहुमान

गिरगावातील प्रती शिरडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'साईधाम' या सुप्रसिद्ध संस्थेकडून 'श्रीसाईलीला' मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचा बहुमान करण्यात आला आहे. या संस्थेने त्यांना तहहयात आजीव सन्माननीय सभासदत्व बहाल करून- त्यांना गौरवांकीत केले आहे.

**साईभक्ती, साईसेवा, साईसाहित्यसृजन व साई भक्तां-बद्दलची आत्मीयता याबद्दल त्यांचा हा गौरव आहे.**

# निष्ठावान भक्त 'शामा' उर्फ माधवराव देशपांडे

● साईभक्त माधवराव देशपांड्यांना बाबांनी 'शामा' असे लाडके नाव ठेवले होते. त्यांच्या जीवावर आलेले संकट बाबांनी कसे काय टाळले ही घटना खरोखरीच लक्षात घेण्यासारखी आहे. सकाळी स्नान करून पुजेचे सामान कोनाड्यातून काढीत असता लपून बसलेला साप एके दिवशी माधरावांच्या करंगळीला चावला. त्यांचे अंग काळे निळे पडू लागले. घरातल्या मंडळींचे तोंडचे पाणी पळाले. एकजण घरातला म्हणाला,

त्यांना विरोबाच्या देवळात नेऊन टाका. म्हणजे विष चटकन् उतरेल. पण माधवराव विरोबाकडे जाण्यास तयार होईनात. त्यांनी निक्षून सांगितले, "मला बाबांच्या पायाजवळ द्वारकामाईत नेऊन टाका! मग माझे तिथे काहीही होऊ द्या!" सर्व मंडळी त्यांना लगेच घेऊन द्वारकामाईत गेली. त्याबरोबर बाबा मोठमोठ्याने शिव्या देऊ लागले व माधवरावांना वर येऊ देईनात ते गर्जना करून म्हणाले, 'अरे भटुरड्या वर चढशील तर खबरदार! चल निघ खाली उतर!'' बाबांचा, तो अक्राळ विक्राळ अवतार पाहून बिचारे माधवराव अत्यंत निराश झाले. त्यांना वाटले आपण आता काही जगत नाही. ते मनात म्हणाले, "मशीद माझे मायेर घर. मी बाबांचा पोर! पण आई मुलावर जर रुसली तर मुलाने काय करायचे!"

थोड्या वेळाने बाबांचा राग शांत झाला. माधवराव पायरीखालीच उभे होते. त्यांची परिस्थिती अक्षरशः दयनीय होती. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "ही उदी घे आणि आता घरी जा! सारखा येरझारा घालीत रहा. रात्रभर अजिबात झोपू नकोस. द्वारकामाई तुझे रक्षण करेल." आणि खरोखरीच तसे झाले. भयंकर विषारी जनावर डसले असताना देखील माधवरावांच्या विषाला उतार पडला व ते दुसऱ्या दिवशी खडखडीत बरे झाले. कारण बाबांनी रागाने उच्चारलेल्या शब्दात फार मोठा अर्थ भरला होता.

"चढू नको भटुरड्या वर! चढशील तर खबरदार. चल निघ जा उतर" ही वाक्ये वास्तविक त्यांनी दंश केलेल्या नागाच्या विषाला उच्चारली होती त्यामुळे माधवरावांचे विष चढले नाही. खरोखरीच गुरूच्या वचनातील खरा भावार्थ लक्षात घेतला पाहिजे आणि त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. कारण संत मुखोद्गारातून निर्माण होणाऱ्या कृपेस पारावार नसतो.

श्रीसाईबाबांचे निकटभक्त श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण कुलात शके १७८२ मार्गशीर्ष शु. पंचमीच्या दिवशी नगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात शिरडीपासून पश्चिमेस २० मैलावर निमोण गावी झाला. माधवरावांच्या मातोश्री ह्या त्यांच्या वडिलांचे चौथे कुटुंब. पहिल्या तीनही कुटुंबाना संतती झाली नाही म्हणून शिरडी निवासी श्री. लक्ष्मण मामा कुलकर्णी यांच्या भगिनी यांना त्यांनी चौथे कुटुंब केले. माधवराव हे त्याचे पहिलेच अपत्य माधवराव जन्मल्यावर तिसऱ्याच वर्षी माधवरावांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस आले. माधवरावांचे शिक्षण शिरडीसच झाले. ते मराठी पाचवी सहावी शिकले होते. त्यांना संस्कृतचा किंवा इंग्रजीचा गंधही नव्हता. माधवरावांना काशीनाथ बळवंत व बापाजी बळवंत असे दोन धाकटे बंधू होते.

माधवरावांची दोन लग्ने झाली. पहिल्या कुटुंबाचे नाव सौ. सावित्रीबाई, त्यांना एकच अपत्य झाले. त्याचे नाव एकनाथपंत.

माधवरावांच्या दुसऱ्या कुटुंबाचे नाव सौ. द्वारकाबाई त्यांना श्री. जगन्नाथपंत श्री. उद्धवराव असे दोन मुलगे व सौ. बबीताई अशी तीन अपत्ये झाली.

माधवरावांचे शरीर धिप्पाड होते. ते चांगले उंच व मजबूत बांध्याचे होते. त्यांचा वर्ण निमगोरा. त्यांची प्रकृती निकोप व निरोगी होती. त्यांचा आहार चांगला आहे. वयाच्या ७२ वर्षा पर्यंत त्यांना कधी ताप आला नाही. किंवा त्यांचे कधी काळी साधे डोके पण दुखले नाही.

माधवराव पूर्ण सनातनी धर्माचे होते. खाण्यापिण्यासंबंधाने त्यांचे आचरण अतिशय शुद्ध व नियमबध्द असे. काहीं घराशिवाय परक्या ठिकाणी ते कधी जेवत नसत. त्यांना स्वयंपाक उत्तम करता येत असे. त्यांना हिंदुधर्माचा खूप अभिमान होता.

माधवराव लहानपणी काहीं वर्षे शिरडीतील शाळेत दुय्यम किंवा मदतनीस शिक्षक म्हणून काम करीत. नंतर पुढे काही वर्षे त्यांनी बाबांच्या परवानगीने शिरडीपासून ७–८ कि. मि. अंतरावर असलेल्या अस्तगाव गावची पाटिलकी मोठ्या यशस्वीपणे सांभाळली. नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली. ते नेहमी बाबांचे नाव घेऊन औषध देत व औषधात बाबांची उदी घालत. बाबांच्या कृपेने त्यांच्या हातास नेहमी यश येई. त्यांना नाडीपरीक्षा चांगली असे. मोठमोठ्या नामांकित डॉक्टर-वैद्यानी; हात टेकलेले रोगी ते बाबांचे नाव घेऊन बरे करत. त्यांना रोगाची व औषधाची माहिती चांगली असे. ते कुणाजवळही वैद्यकशास्त्र शिकले नव्हते पण आर्य वैद्यकाची काही पुस्तके वाचून व बाबांच्या मुखातून आलेली नानाप्रकारच्या रोगावरील औषधे लक्षात ठेऊन ते वैद्यकीचा धंदा करीत.

माधवराव मदतशिक्षकाचे काम करीत होते. तेव्हा त्यांचा वर्ग शिरडीत श्रीद्वारकामाई समोर श्री. गुंड सर्कल इनस्पेक्टर यांनी बांधलेल्या घरात, काही दिवस श्रीराधाकृष्णा आई राहात असलेल्या घरात व शेवटी शेवटी बाबांच्या श्रीशामसुंदर वारूचे निवासस्थान असलेल्या लहानशा घरात असे. माधवराव शिक्षकाचे काम करू लागले तेव्हा त्यांचे वय १४-१५ वर्षांचे होते. बाबा शिरडीस आले ते माधवरावांच्या देखतच आले. त्यावेळी माधवराव बाबांना एक धुनी लावून मशिदीत बसणारा व नेहमी चिलीम फुंकणारा वेडसर अल्प वयी १९-२० वर्षे वयाचा फकीर आहे इतकेच मानीत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, सगुण परमात्मा आहेत ही भावना त्यांचे जवळ मुळी नव्हतीच. ते बाबांकडे फक्त चिलीम ओढण्यासाठी म्हणून जात इतकेच काय ते.

माधवरावांची पहिली १०-१२ वर्षे बाबासंबंधीच्या अशाच भावनेत गेली. पुढील १०-१२ वर्षे बाबा सत्पुरुष आहेत अशा भावनेत गेली व बाबांचा जसजसा निकट व नित्य सहवास होऊ लागला व त्यांच्या सिद्धत्वाचे प्रत्यक्ष अनुभव येऊ लागले व इतर नानासाहेब चांदोरकरादि भक्तगणांचे हजारो मूर्तिमंत अनुभव नित्य कळू लागले तेव्हा त्यांची पुढील २०-२२ वर्षे बाबा हे सिद्ध पुरुष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा आहेत अशा दृढ भावनेत व बाबांच्या आज्ञाधारक पणात व भक्तवृंदांच्या सेवा सुश्रुषेत गेली. त्यांनी ४२-४३ वर्षे सतत बाबांच्या निकट सहवासात काढली. नंतर बाबांच्या समाधी कालापासून अंतकाळापर्यंत २३ वर्षे त्यांनी वैद्यकीचा धंदा केला.

बाबा माधवरावांना पहिल्यापासूनच 'शाम्या' या लाडक्या नावाने संबोधीत. बाबा पुष्कळ भक्तांना निरनिराळया टोपण नावानी हाक मारीत, व सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची ती सर्व नावे अगदी अन्वर्थक होती. 'शाम' हे नावही अत्यंत अर्थपूर्ण आहे व त्यात अत्यंत प्रेम व एक प्रकारची जादू भरलेली आहे.

श्रीसाईबाबांचे माधवरावांच्यावर भारी प्रेम होते. कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या वडील चिरंजीवांचे लग्न ग्वाल्हेरीस झाले असता आपण लग्नास यावे म्हणून नानासाहेबांनी बाबांना समक्ष निमंत्रण दिले तेव्हा "माझ्या शाम्याला घेऊन जा" असे बाबा म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास गेले.

कै. भक्तवर्य काकासाहेब दिक्षीत यांनी असेच आपल्या वडील चिरंजीवांचे लग्नाकरिता बाबांना समक्ष निमंत्रण केले तेव्हाही "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असे बाबा त्यांना म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास नागपूरास गेले.

एकदा काकासाहेब दिक्षीत गहिवरून बाबांकडे द्वारकामाईत आले. "काका तुला काय पाहिजे ! म्हणून बाबांनी त्यांना प्रश्न केला. काका म्हणाले," बाबा आपला सहवास असावा "बाबा म्हणाले," ह्या श्याम्याला आपल्या जवळ ठेवून घे म्हणजे मी जवळच आहे या नंतर काका माधवरावाना बहुधा आपल्या जवळच ठेवीत असत.

एकदा बाबांचे एक भक्तशौंड श्री. बाळासाहेब मिरीकर कोपरगावचे मामलेदार यांचा मुक्काम दौंड-मनमाड रेल्वेवरील कोपरगाव नजीक चितळी गावात श्रीमारुती रामाचे मंदिरात असताना ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले दर्शन केल्यावर परत चितळीस जाण्यास त्यांनी बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले," जा पण माझ्या शाम्याला बरोबर घेऊन जा. बाळासाहेब बाबांच्या आज्ञेप्रमाणे माधवरावांना बरोबर घेऊन गेले. त्याच रात्री बाळासाहेबांचे अंगावर मोठा थोरला भयंकर सर्प त्यांना नकळत चढला पण त्याने दंश करण्यापूर्वीच बाळासाहेबांनी त्याला हातानेच लांब उडवून दिले. जवळच्या लोकांनी मग त्याचे तुकडे तुकडे केले. माधवरावांचे सहवासामुळे व बाबांच्या कृपेने बाळासाहेब या प्राण संकटातून बचावले.

श्रीमंत बापूसाहेब बुटी माधवरावांना बाबांच्या प्रमाणेच मान देत असत.

यावरून अर्जुन श्रीकृष्णाचे जोडीप्रमाणे माधवराव-बाबांची जोडी होती, माधवरावांना बाबा जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत 'श्यामा' म्हणून संबोधीत तसेच माधवरावही बाबांना प्रथमपासून शेवटपर्यंत 'देवा' म्हणून संबोधित बाबा व माधवराव यांच्यात नेहमी सुखसंवाद, वार्तालाप व विनोद चालत असत. माधवरावांना जरी विपुलसंपत्ती दिली नाही तरी माधवरावांचे वरील त्यांचे प्रेम अवर्णनीय होते यात शंकाच नाही. ग्वाल्हेरचे माधवरावमहाराज शिंदे माधवरावांना पाच हजार रु. देत असता बाबांनी त्यांना ते घेऊ दिले नाहीत. तरीपण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य ही त्यांना भोगावयास देऊन बाबांनी माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अती खर्चाच्या श्रमाच्या व दगदगीच्या अशा ज्या भारतातील चार धामाच्या श्री द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ, बद्रीनारायण, बद्रीकेदार, गंगोत्री, जन्मोत्री श्री काशी, अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन, गया, हरिद्वार, प्रयाग, उज्जैन, गिरनार, मातृगया, नाशिक, त्रिंबकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, दौलताबाद, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी, मदुरा, मीनाक्षी पक्षीतीर्थ ई. इ. यात्रा विनामूल्य बाबांनी अनायासे माधवरावांना आनंदात, सुखात व ऐष आरामात कोटयाधीशांचे व लक्षाधीशांचे सहवासात करून दिल्या. हत्तीचे अंबारीत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार

सरकार, शेटसावकार, जहागिरदार, राष्ट्रपुरुष, राजकारणी विभूती, इनामदार, मोठे मोठे सरकारी अधिकारी व सुखवस्तु लोक यांनी माधवरावांना काही प्रसंगी सन्मान्य पाहुणे बनवून माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांचे पायापडावयास लावले. या सर्व प्रसंगी माधवरावांनी बाबांची खूपखूप प्रसिद्धी केली हीच माधवरावांची मुख्य कामगिरी म्हणावयास पाहिजे त्यांनी रसाळ व प्रसाद युक्तवाणीने बाबांच्या लीला कथन करून अनेकांना बाबांचे भक्त बनविले.

बाबांचे रोजचे टपाल वाचून दाखविण्याचे, बाबा सांगतील त्याप्रमाणे भक्तांना पत्रांची उत्तरे लिहिण्याचे, बाबांच्या नावावर आलेल्या भक्तांच्या मनी ऑर्डरी घेण्याचे व त्यांचे पैसे बाबांना विनचूकपणे नेऊन देण्याचे काम काही दिवस याच माधवरावांच्याकडे होते.

श्रीबाबांच्या महानिर्वाणानंतर माधवरावांना चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते व ते अगदी सहाजिक आहे. बाबांच्या नंतर श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुटी यांनी माधवरावांच्याकडे बाबांच्या समाधी मंदिराच्यावरील सर्व भागाची साफसफाई व देखरेख करण्याची कामगिरी करण्या बद्दल त्यांना बापूसाहेबांकडून महिना सात रुपये मिळत असत. बापूसाहेबांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव श्री. केशवराव यांनी हीच कामगिरी त्यांचेकडे सोपविली होती.

श्री. माधवरावांनी आपला देह काकासाहेब दिक्षित, भाऊसाहेब धुमाळ, अण्णासाहेब दाभोलकर या पुण्य भक्तांप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कष्ट न सोसता फक्त एक अहोरात्र व दुसरे दिवशी रात्री बारा वाजेतो पर्यंत बेशुद्ध स्थितीत राहून आपल्या स्वतःच्या वास्तूत शके १८६२ चैत्र कृ. चतुर्थी गुरुवार दिनांक २६ एप्रिल १९४० या पुण्यदिवशी रात्री श्रीसाईसद्‌गुरूमाऊलीच्या दिव्य चरणी ठेवला. त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षाचे होते. श्रीसाईबाबांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी अनंतात विलीन स्वतःला केले व बाबांचा सच्छील लाडका भक्त 'श्यामा' उर्फ माधवराव देशपांडे वयाच्या ८० व्याच वर्षी निधन पावले हा एक योगायोग आहे असेच म्हणावे लागेल.

माधवरावांचे नंतर बाबांचे एक निष्ठावान सेवक व भक्त श्री. सखाराम बळवंत धुमाळ हे पण २९ जून १९४० रोजी ठाणे मुक्कामी हृदयविकाराने कालवश झाले. बाबांनी त्यांना समक्ष आश्वासन दिले होते की तुला मी फुलासारखा ठेवीन व फुलासारखा नेईन. श्री धुमाळ साहेब नाशिक येथे वकील होते.

❋ ❋ ❋

# परम साईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर

● श्रीसाईबाबांचे अति निकटचे स्नेही व भक्त म्हणून श्री. नानासाहेब चांदोरकर यांचे नाव घेतले जाते. त्यांचे संपूर्ण नाव श्री. नारायण गोविंद चांदोरकर. त्यांचा जन्म ठाणे येथे शके १७८२ इ. सन १८६० च्या पौष महिन्यातील मकर संक्रांतीच्या दिवशी झाला. त्यांचे मराठी शिक्षण कल्याण येथे व इंग्रजी शिक्षण मुंबईस एलफिस्टन विद्यालयात व त्यापुढचे एलफिस्टन महाविद्यालयात झाले. ते मुंबई विद्यापीठाचे बी. ए पदवीधर. संस्कृत हा त्यांचा अतिशय आवडीचा विषय.

बी. ए. नंतर त्यांची नेमणूक प्रथम संगमनेर येथे मामलतदार कचेरीत कारकूनाचे जागेवर झाली नंतर ते काही दिवसानी नगर जिल्हातील कोपरगावी ते अव्वल कारकून म्हणून नेमले गेले. १८९२ साली नगर येथे ते कलेक्टर साहेबांचे चिटणीस झाले पुढे १८९३ साली त्यांना पुणे जिल्ह्यात घोड नदी तालुक्याचे मामलतदार नेमण्यात आले. नंतर पुन्हा १८९४ ते १९०१ पर्यंत नगर जिल्ह्याच्या कलेक्टर साहेबांचे चिटणीस नेमण्यात आले. १९०२ मधे त्यांना जामनेर तालुक्याचे मामलतदार नेमले गेले. नंतर त्यांची बदली अनुक्रमे नंदुरबार, पंढरपूर इ. ठिकाणी मामलतदार म्हणून करण्यात आली होती. १९०८ साली ते पुणे येथे डिस्ट्रीक्ट डेप्युटी कलेक्टर झाले व १९०९ साली त्यांची बदली ठाणे येथे डिस्ट्रीक्ट डेप्युटी कलेक्टर म्हणून झाली व १९१५ साली ते डिस्ट्रीक्ट डेप्युटी कलेक्टर या पदावरूनच सेवानिवृत्त झाले.

श्री. नानासाहेब यांचा विवाह १८७८ साली कल्याण येथे झाला. अलिबाग जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पळसपे गावातील प्रसिद्ध श्रीमान सावकार व जमीनदार ओझे घराण्यातील श्री. विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे यांची कन्या बयाबाई यांचेशी झाला. त्यांचे सासरचे नाव राधाबाई. नानांना बरीच अपत्ये झाली.

नानासाहेब कोपरगावी अव्वल कारकून असताना त्यांचा लहान मुलगा आजारी पडला पण त्यावेळी तिथे रुग्णालय नसल्याने व वेळेवर औषध पाण्याची सोय न झाल्याने तो मरण पावला. औषध पाण्यावाचून येथल्या लोकांची बरीच गैरसोय होत असते म्हणूनच की काय, नानांनी १८९० साली आपले स्वतःचे

पैसे खर्च करून एक खाजगी रुग्णालय कोपरगावी काढले व ते १८ वर्षें चालवून पुढे लोकल बोर्डाचे ताब्यात दिले.

अहमदनगरच्या कलेक्टर साहेबांचे चिटणीस श्री. चिंदबरराव गाडगीळ यांची बदली मामलतदाराच्या जागी झाली. नाना चिटणीस पदावर असताना कोपरगाव तालुक्याची जमाबंदी त्यांचेकडे होती तेव्हा शिर्डीचे आप्पा कुलकर्णी हे बाबांची आज्ञा घेऊन जमाबंदीसाठी नगरला जायला निघाले तेव्हा श्रीबाबांनी आप्पाला निरोप दिला की नानांना मी बोलावले आहे सांग. आप्पानी नगरास गेल्यावर बाबांचा निरोप नानांना सांगितला पण नानांनी येत नाही असा जबाब दिला असे तीन वेळा झाले. शेवटी नानांनी बाबांच्या भेटीस येण्याचे कबूल केले.

पुष्कळ दिवस रद्दी म्हणून गाठोड्यात बांधून ठेवलेला व मानेवर थो ड फाटलेला अलपाकाचा कोट घालून ते एके दिवशी बाबांच्याकडे यावयास निघाले. पण आपण एखाद्या संताकडे जात आहोत की आप्पाच्या नादी लागून एखाद्या भणंग फकिराकडे जात आहोत; व संताकडे जात असू तर त्यांचे पुढे ठेवण्यासाठी आपल्याजवळ काहीच नाहीं अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनात डोकावू लागले. पुढे शिरडी जवळ जात असता सहज म्हणून त्यांचे हात खिशात गेले तो काय आश्चर्य! एक पुडी त्यांना सापडली. ती उघडून पाहाता तीत तीन चार बदाम बिया व तीन चार खडीसाखरेचे खडे त्यांना आढळून आले. त्यांना आनंद झाला. ते बाबांकडे गेले व बाबांना सा. न. घालून त्यांच्यापुढे ती पुडी ठेवुन ते बाबांजवळ बसले व मला कां बोलावलेत म्हणून त्यांनी बाबांना विचारले, "अरे जगात एकच का नाना आहे व मी तुलाच का बोलावले याचे काही कारण असेलच की नाहीं. तुझी व माझी चार जन्माची संगती आहे. तुला माहीत नाही पण मला माहित आहे." नानांचा या गोष्टींवर विश्वासच बसेना. नानांच्या आग्रहावरून बाबांनी त्या पुडीतील थोडासा बदामाचा तुकडा व खडीसाखरेचा खडा ठेवून बाकीची पुडी नानांना परत दिली व आता येत असेच जा असे नानांना परत जाताना सांगितले. पुढें नगरला प्लेग सुरू झाला तेव्हा बाबांना विचारूनच नानांनी टोचून घेतलें.

एकदा नानासाहेब हरिश्चंद्राचे डोंगरावर देवीच्या दर्शनासाठी म्हणून गेले पण डोंगराच्या मध्यावर आल्यावर त्यांना वरती चढवेना व खाली ही उतरवेना यातच तहानेने ते व्याकुळ झाले. ते एका दगडावर थकलेल्या अवस्थेत बसले. एवढ्यात एक मोळीविक्या आला. त्याच्याकडे पाण्याची त्यांनी विचारपूस केली तेव्हा तू जिथे

बसला आहेस तिथे पाणी आहे असे त्याने सांगितले व खरोखरच नाना जिथे बसले होते तिथे पाणी मिळाले. काही दिवसांनी नाना बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीस गेले तेव्हा बाबांनी त्यांना या गोष्टीची आठवण करून दिली. तेव्हा नानांना बाबा खूप कौतुक वाटले व बाबांच्यावरील त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागली पुढे नानांनी शिरडीस एक छोटेसे घर बांधले व ते तिथे राहावयास जात. त्यांनी ठिकठिकाणी तंबू बांधून बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची सोय प्रथम केली. आपल्या पदरच्या खर्चाने त्यांनी एक खाणावळ पण काढली. बाबा निरनिराळया लोकांकडून, मारवाड्यांकडून रकमा आणून आपल्या भक्तांची योग्य ती संभावना करीत असत व नानासाहेब शिरडीस आले म्हणजे त्यांना त्या रकमांची भरपाई करण्यास सांगत असत व नाना पण न कुरकुरता सारे पैसे चुकते करीत व मारवाड्यांच्या पोहोच पावत्या घेऊन त्या बाबांच्या चरणी अर्पण करीत. या व्यवहारानिमित्ताने श्रीबाबांनी नानासाहेबांना अनेक प्रकारचा उपदेश करून अनेक अनुभव दिलेले आहेत. नानांनी बाबांच्याकरिता शिरडी कार्यासाठी अत्युत्कृष्ट भावनेने व अमर्याद प्रेमाने कमीत कमी दहा हजार रुपये खर्च केले. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. ता. २१-८-१९२१ रोजी श्रावण कृ. ४ शके १८४३ रोजी नानासाहेब कल्याण येथे आपल्या स्वतःच्य घरी श्रीसाई चरणी विलीन झाले.

श्रीसाईबाबा नानासाहेबांच्या जवळ स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीस आणण्यास व त्यांची सुकीर्ती वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत असे म्हणावे लागल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. बाबा मूळचेच अमोल रत्न परंतु हे अमोल रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले त्यामुळे त्यावेळी त्यांची प्रसिद्धी जेवढी व्हावयाला पाहिजे होती तेवढी झाली नव्हती पण नानासाहेबांचे मुळे अनेक पदवीधर व बड़ी बडी मंडळी शिरडीस फार मोठ्य प्रमाणावर येऊ लागली व बाबांची ऊज्ज्वल अशी कीर्ती सगळीकडे पसरली. बाबांनी नानांना परमार्थाचे अनेक धडे दिले, अनुभव दिले, दृष्टांत पण दिले.

# परमभक्त श्री राधाकृष्णामाई

● बाबांच्या परमभक्त श्री राधाकृष्णा माईचे मूळ नाव सुंदराबाई क्षीरसागर अहमदनगरचे प्रसिद्ध वकील श्री. बाबासाहेब गणेश यांच्या या नात. त्यांना पंढरपूरच्या क्षीरसागर कुटुंबात दिले होते. त्या वयाच्या १८–२० वर्षांच्या असताना त्यांचे पती वारले. तेव्हापासून त्या सकेशा बालविधवा होत्या. त्या तरुण, देखण्या, सशक्त व काळ्या सावळ्या वर्णाच्या होत्या. श्रीबाबांची कीर्ति ऐकून इतर भक्त जसे शिरडीस येत तशा त्या पण पंढरपूराहून कै. नानासाहेब चांदोरकर यांच्या बरोबर इ. स. १९०५–१९०६ च्या सुमारास शिरडीस आल्या. त्यांना कुणीही पत्र पाठवून शिरडीस बोलावले नाही. त्या स्वयंस्फूर्तीने शिरडीस आल्या त्यांची बाबांवर अत्यंत प्रेमळ भक्ती असून त्यांनी आपले तन व मन त्यांना सर्वस्वी अर्पण केले होते. शिरडीस त्या आल्यापासून बाबांनी त्यांना मशिदीची पायरी कधीही चढू दिली नाही; व त्यापण कधीही मशिदीत आल्या नाहीत, किंवा मशिदीत येण्याचा त्यांनी कधीही हट्ट किंवा आग्रह धरला नाही. बाबा हे आपल्या पूर्वजन्मीचे पति होत असे समजून त्या बाबांची सेवा करीत, व आपला चेहरा विनयपूर्वक लज्जेने झाकून घेत. तो कधीही बाबांना दाखवीत नसत. बाबाही ही पूर्वजन्मी आपल्या जवळ होती पण आपण तिला कधी शिवलो नाही असे म्हणत, असे बाबांचे निकटवर्ती भक्त माधवराव देशपांडे उर्फ शामा म्हणत. बाबा त्यांना योग्य मान देत व मशिदीसमोर थोड्या अंतरावर असलेल्या एका लहानशा घरात त्यांची रहाण्याची व्यवस्था त्यांनी केलेली होती, बाबा त्यांना दररोज एकदा दुपारी आलेल्या भिक्षेपैकी काही भाग व नैवेद्या पैकी एक भाकरी व थोडीशी भाजी माधवरावांच्या बरोबर पाठवीत असत. बाबांकडून जी भाजी–भाकर येई तोच प्रसाद मानून त्या त्यावरच राहात; आणि बाबांच्या चरणांचे तीर्थ मिळवून त्यांचा पाण्याऐवजी उपयोग करीत. ह्या शिरडीस आल्यापासून बाबांना नित्य नेमाने पाच गोविंद विडे व कुटलेले विडे पाठवीत व त्यापैकी एक कुटलेला विडा बाबा रोज दुपारच्या भोजनानंतर खात व वर पाणी पीत. यांचे जवळ एक लहानशी धातूची गोपाळ कृष्णाची मूर्ति होती. त्या मूर्तीस त्या अहोरात्र जवळ बाळगीत त्यांच्या मुखात राधाकृष्ण हे नाव निरंतर असे व त्यामुळेच त्यांना राधाकृष्णी हे नाव पडले. बाबा सुद्धा त्यांचा उल्लेख रामकृष्णी किंवा राधाकृष्णी असाच करीत.

राधाकृष्णमाई शिरडीस आल्यापासून बाबांची पूजा व आरती होऊ लागली, व आरतीच्यावेळी अबदागिर, चवऱ्या, छत्रचामरे बाबांवर ढाळू लागली. बाबा एक दिवसाआड चावडीत झोपावयास जाऊ लागले. ते चावडीत जाताना वाजत-गाजत घोडा (शामकर्ण) पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, गरुडटके, पताका वगैरे इतमामानिशी जात असत. बाबांची शेजारती व काकड आरती माई आल्या-पासूनच सुरू झाली व ती सारी व्यवस्था राधाकृष्णमाईच्याकडेच असे. चावडीची मिरवणूक निघाल्यावर त्या स्नान करून पाच दिवे कंदिलात ठेवून स्वतः पांढरे पातळ नेसून तोंडावर बुरखा घेऊन तो कंदील मशिदीच्या पायरीवर ठेवून नमस्कार करून परत जात असत.

बाबा चावडीत झोपावयास जाऊ लागल्यामुळे चावडी आरसे, हंड्या, झुंबरे व तसबिरी इत्यादींनी सजली गेली. पूजेच्या आरतीच्या व चावडीच्या मिरवणूकीचे कामासाठी तसेच गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी, रामनवमी इ. उत्सवासाठी चांदीची भांडी, मौल्यवान वस्त्र भूषणे, गॅसचे सुंदर लहानमोठे दिवे आणविण्याची व सर्व करून घेण्याची सर्व कामगिरी माई श्रीमान भक्तांकडून करवून घेत. पण बाबांना या सर्व इतमामाची मनापासून इच्छा किंवा अपेक्षा नसे. ते हे सर्व नको नको म्हणत व शिव्या शाप देत, रागावत. श्रीनानासाहेब चांदोरकरांना ते नेहमी सांगत आपली खरी इस्टेट किंवा ऐश्वर्य म्हणजे फाटके तरट, माथ्यावरील पांढरे फडके, पायघोळ कफनी, एक खापर, चिलीम, तंबाखू, टमरेल, सटका, (लहान सोटा) इतकेच काय ते, पण भक्तलोक अनेक अनावश्यक व निरुपयोगी वस्तु बहुमोल आभूषणे आणून आपणाला व्यर्थ त्रास देतात. त्यांची मुख्य शिकवण अशी असे की गरीबों अव्वल बादशाही। अमीरीसे लाख सवाई ॥ गरीबोंका अल्ला भाई। अक्षयी साई वदतकी ॥

बाबाभक्त राधाकृष्णमाईची रोजची मुख्य कामगिरी म्हणजे मशिदीपासून लेंडीस शौचास जाण्याचा बाबांचा रस्ता झाडून साफ करणे ही होती. आपल्या अखेरपर्यंत त्यांनी ही सेवा स्वखुषीने व मोठ्या आनंदाने केली. त्या शिरडीस नऊ-दहा वर्षे राहिल्या व १९१६ साली आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांनी आपला अवतार शिरडीसच संपविला. त्या प्रेमळ व मनमिळाऊ होत्या. त्यांच्या नंतर माई-च्याकडील बाबांची कामगिरी बाबांचे एक निस्सीम भक्त अब्दुलभाई करू लागले. बाबा रोज मशिदीतून साठे-नवलकर यांच्या वाड्यापर्यंत फिरावयास व हातवारे करावयास जात त्यावेळी त्यांना ऊन लागू नये म्हणून व पूजेसाठीही फुले सहज

मिळावी म्हणून तितक्या रस्त्यावर लोखंडी कमान बांधून त्यावर सुवासिक पुष्पवेली लावण्याची कामगिरी बाबा नको नको म्हणत असता व शिव्याशाप देऊन रागे भरत असता साईभक्त श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्या सहाय्याने त्यांनी करून घेतली. तसेच मशिदीची दुरुस्ती, पाया बांधणे इ. जरुरीची कामे पण त्यांनीच करून घेतली.

राधाकृष्णमाई या बाबांच्या उदार, प्रेमळ, उत्कट, निस्सीम व अनन्य भक्त होत्या. त्यांनी बाबांची व त्यांच्या संस्थानची मनोभावे सेवा केली व इतर अनेक भक्तांकडून करून घेतली. यामुळे त्यांचा परमार्थातील अधिकार फार मोठा व उच्च दर्जाचा झाला होता. भक्त या नात्याने त्यांचा बाबांचा काय संबंध होता हे स्वतः बाबांनाच काय ते माहित ! त्या उत्कृष्ट गायिका होत्या व त्यांचा कंठही गोड, दिव्य, मधुर असा होता. त्यांना संगीताचे ज्ञान होते. त्यांना सतार पण वाजविता येत असे.


## धर्म प्रशिक्षण शिबीर

पुणें — कीर्तन महाविद्यालयातर्फे येत्या मे महिन्यात दि. १२ ते १७ सोळा दिवस चिंचवड येथे धर्मप्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे. त्यांत हिंदुधर्म व तत्वज्ञान। षडदर्शनांचे मूलभूत सिद्धांत। भारतीय व पाश्चिमात्य तत्वज्ञान। अन्य धर्म व संप्रदाय । सर्व भक्तिसंप्रदाय । आणि भारताचा सांस्कृतिक इतिहास इ. विषय शिकविण्यात येतील. शिवाय नऊ छोटी इंग्रजी प्रवचने बसवून घेण्यात येतील. कीर्तनकार । प्रवचनकार । व्याख्याते । शिक्षक व धर्मतत्वज्ञानाचे अभ्यासिक यांस अपूर्व संधि आहे. प्रवेशसंख्या मर्यादित आहे. त्वरेने रु. १५।– प्रवेश शुल्क भरुन नाव नोंदवा. शिक्षण निवास विनामूल्य, खानपान खर्च रु. ७५।– ... संपर्क – गं. ना. कोपरकर, १२३२, सदाशिव पेठ, पुणे ३०.

# साईभक्त श्री. बापूसाहेब जोग

श्री. सखाराम हरी उर्फ बापूसाहेब जोग हे श्रीसाईबाबांचे एक निष्ठावान भक्त होते. १९०९ साली ते सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर कुटुंबासह शिरडीस महाराजांच्या दर्शनासाठी म्हणून आले व महाराजांनी त्यांना येथे जे ठेवून घेतले ते कायमचेच. सामान सुमान आणण्यासाठी सुद्धा त्यांना शिरडीतून जाऊ दिले नाही. बापूसाहेब तत्त्वज्ञानी कर्मनिष्ठ व सत्त्वशील ब्राह्मणाचे एक उत्कृष्ट आदर्श होते. त्यांच्या पत्नीना बाबा 'आई' या नावाने संबोधित असत. सुरुवातीस बापूसाहेब खूप उग्र रागीट व तामसी वृत्तीचे होते पण बाबांच्या सहवासात त्यांच्या वृत्तीत बदल झाला.

साई महाराजांची आरती ह. भ. प. मेघाच्या पासून सुरु झाली. पण १९१२ साली मेघाच्या देहावसानानंतर महाराजांची आरती धरण्याचा मान बापूसाहेबांना मिळाला, व साईबाबांनी देहविसर्जन केल्यावर दोन तीन वर्षांनी बापूसाहेब साकोरीस राहण्यास गेले तेथपर्यंत तो त्यांच्याकडेच होता.

श्रीसाईनाथ महाराज अनंतात विलीन झाल्यावर त्यांच्या स्थूल देहाची मशिदमाईत पूजा व आरती याच श्री. बापूसाहेबांनी केली. पूजा झाल्यावर नित्या-प्रमाणे बापूसाहेबांनी महाराजांचे हातावर दक्षिणा ठेवली. पण तो देह निर्जिव असल्यामुळे दक्षिणा हातात राहावी म्हणून बापूसाहेबांनी महाराजांची बोटे वळविली व चमत्कार असा की जरी महाराजांनी देह सोडून २१ तास लोटले होते तरी त्यांची बोटे ताठली नव्हती. बापूसाहेबांनी दक्षिणा देऊन मूठ मिटली ती तशीच राहिली पुढे त्याच दिवशी देह समाधित ठेवला व तेव्हापासून बाबांची आरती समाधिमंदिरात जी होऊ लागली ती आजतागायत. महाराजांच्या निधनानंतर बापूसाहेबांच्या वैभवालाही उतरती कळा लागली. श्रीसाईंच्या निधनानंतर त्यांच्या संबंधीचे काही धार्मिक विधी उपासनी बाबांनी श्रीक्षेत्र काशी येथे केले. याकामी बापूसाहेबांनी पुढाकार घेतला होता. स्वतःच्या पदरचे एक हजार रुपये त्यांनी या कामी खर्च केले होते. याच बापूसाहेबांनी एकावेळीं श्रीउपासनी बाबांना धोतराने

बांधून शिर्डीच्या खंडोबाच्या देवळातून श्रीसाईबाबांच्या पुढे मशिदित खेचत आणले होते. बाबांच्या दोन वस्तू चिलीम व सटका, या बाबांच्या सहवासातील सेवेकरी माधव याने बापूसाहेबांचे स्वाधीन केल्या व त्या वस्तू त्यांनी नित्य पूजेस ठेवल्या होत्या. आपले अखेरचे दिवस त्यांनीं साकोरीस घालविले. साकोरीसच ते निधन पावले त्यावेळीं त्याचे वय ७० वर्षांचे होते.

★


— ७५ वा अमृतमहोत्सवी प्रयोग —

दि. ६ मे सकाळी १० वा. साहित्यसंघ — रात्रौ ८॥ वा. शिवाजी मंदिर

"श्री साईबाबा संस्थान शिरडी"च्या सौजन्याने



श्री साईबाबांचे
तेजस्वी जीवन रंगभूमीवर

कुमारसेन गुप्ते
साईभक्तांसह सादर करीत आहेत
"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

**शिरडीचे श्री साईबाबा**

लेखक/दिग्दर्शक : किरण दुधाळकर • नेपथ्य : दत्ता चौंडणकर
• निर्माता/संगीत : कुमारसेन गुप्ते

दि. १२ मे अंबरनाथ व १३ पासून कोकण दौरा

फोन : ४५ ६५ ४१

संपर्क – कुमारसेन गुप्ते, १४ पितांबर लेन, माहिम, मुंबई – १६.

# श्री. पाठकसाहेबांचा सुंदर सत्कार

जांबोरी मैदान वरळी येथील श्री. मोहिते बाबा यांच्या श्रीसाईमंदिरात रामनवमी उत्सव ५, ६, ७ एप्रिल ७९ असे तीन दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला. या उत्सवातील एक प्रमुख आकर्षण म्हणजे शिरडी संस्थानचे माजी कोर्टरिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांचा सत्कार हे होय. हा कार्यक्रम शुक्रवार दि. ६ एप्रिल रोजी सायं. ७–३० वा. मंदिरात करण्यात आला. या प्रसंगी श्री मोहितेबाबा मंदिराचे प्रमुख कार्यकर्ते श्री. चंद्रकांत सामंत व श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांची प्रसंगोचित भाषणे झाली व श्री मोहिते बाबांचे हस्ते श्री. पाठक यांना सुंदरशी शाल व श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सौ. पाठक पण हजर होत्या. श्री. मोहिते बाबांना या दिवशी पहाटेस श्रीसाईबाबांनी दृष्टांत देऊन सांगितले की आजच्या भंडारा प्रसादाचे वाटप श्री. पाठक साहेबांचे शुभहस्ते व्हावे व त्यानुसार खास दूताकरवी निरोप पाठवून श्री. पाठक यांना दुपारी ११ वा. आमंत्रित करण्यात येऊन श्री. व सौ. पाठक यांचे शुभ हस्ते भंडारा वाटप झाले.

कु. विकास कुळकर्णी

# कै. दत्तकुमार कळसकर शिष्यवृत्ती विजेता

विकास वसंतराव कुलकर्णी या विद्यार्थ्याने श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालयात इ. ५ वी ते १० पर्यंत प्रथम क्रमांक सोडला नाही. विद्यालयात एक हुशार विद्यार्थी म्हणून तो सर्वामध्ये प्रसिद्ध होता. मे १९७८ मध्ये झालेल्या एस. एस. सी. परीक्षेत ७०० पैकी ५४५ गुण मिळून प्रथम क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला. या विद्यालयातून आतापर्यंत १० मध्ये पास झालेल्या मुलांपेक्षा त्याने टक्केवारी जास्त मिळवून शाळेत उच्चांक प्रस्थापित केला. शाळेने ठेवलेल्या विविध विषयांच्या पारितोषिकाचा मान त्याने मिळविला. विशेष म्हणजे या वर्षापासून श्रीमती मंदाकिनी कळसकर, मुलुंड यांनी ठेवलेल्या इंग्रजी विषयाचे "कै. दत्तकुमार कळसकर पारितोषिक" रू. ९० चे त्यास मिळाले. इंग्रजी विषयात त्याला १०० पैकी ७८ गुण मिळून तो सर्वामध्ये प्रथम आला. सध्या त्याने पुणे येथे गव्ह. पॉलिटेक्नीकला प्रवेश घेतला आहे. तेथेही तो चांगले यश संपादन करेल अशी शिक्षकांना आशा आहे. त्याचे वडील श्रीसाईबाबा संस्थानमध्ये नोकरीस आहेत.

## श्रीमान बापूसाहेब बुट्टी

# साईदरबारातील एक प्रमुख भक्त

डॉ. श्री. दि. परचुरे

श्रीसाईसच्चरिताचे नियमाने पारायण करणाऱ्या साईभक्ताना साईबाबांशी ज्यांचा निकटचा परिचय होता त्या सर्व भक्तांची नावे परिचित आहेतच. त्यांमध्ये बापूसाहेब बुट्टी हे एक प्रमुख भक्त आहेत. साईसच्चरित्रातील अध्याय ४, १३, २२, ४३, ४४ मध्ये त्यांचा उल्लेख निरनिराळ्या कारणानी आलेला आपणास दिसतो. श्रीसाईबाबांच्या इतर भक्तांचाही उल्लेख साईसच्चरितामध्ये ठिकठिकाणी येतोच; परंतु बापूसाहेब बुट्टींच्याइतका विविध संदर्भात अन्य फारच थोड्या भक्तांचा उल्लेख त्या पोथीत सापडतो आणि म्हणूनच साईदरबारातील एक प्रमुख भक्त, असा त्यांचा उल्लेख करावा लागेल.

बापूसाहेब बुट्टी ह्यांचे मूळ नाव गोपाळराव असे होते; परंतु त्याकाळी बऱ्याच लोकांना घरच्या माणसांनी हाक मारण्याचे एक विशिष्ट नाव असे व त्या नावाला साहेब ही बिरुदावळी चिकटवून त्या व्यक्तिबद्दल आदर व्यक्त करण्याची पद्धत होती. नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दिक्षित अशा प्रकारच्या अन्य नावांचा उल्लेख साईसच्चरितामध्ये नेहमी आलेला असून, तो ह्याच प्रकारच्या आदराचे प्रतिक आहे. बापूसाहेबांचे घराणे मूळचे नागपूरचे. त्यांचा अलिशान वाडा नागपूरच्या सिताबर्डी ह्या भागात होता. बुट्टी ह्यांच्या घराण्यात सावकारीचा धंदा कित्येक शतके चालू होता. पेशव्यांचे सावकार ज्याप्रमाणे खुद्द पुण्यातच होते, त्याचप्रमाणे नागपूरकर भोसल्यांचे सावकार म्हणून बुट्टी ह्यांची प्रसिद्धि होती. तेव्हा त्यांच्या घरी किती अलोट संपत्ति असावी ह्याची कल्पनाच केलेली बरी, आणि अशा संपत्तीचा थोडाफार गर्व बापूसाहेबांना असल्यास त्यात फार काही वावगे होते असेही म्हणता येणार नाही!

बापूसाहेबांच्या गर्वा विषयींचा थोडा उल्लेख "श्रीगजाननविजय" ह्या श्री गजानन महाराजांच्या चरित्रात आहे तो असा. श्री गजानन महाराज शेगावी रहावयाचे व तेथेच रहाण्यात त्यांना बरे वाटावयाचे; पण एकदा बुट्टीनी त्यांना नागपूरास येण्याची विनंती केली व ती मान्य करून महाराज नागपूरला श्री बुट्टींकडे गेले. बुट्टींच्याकडे संपत्तीचा पूर लोटत असल्यामुळे नोकरचाकर भरपूर होते, त्यामुळे श्री

गजानन महाराजांना काहीच कमी नव्हते. त्यांची बडदास्त फार चांगली ठेवली गेली होती; पण महाराज ह्या प्रकारच्या एकलकोंड्या जीवनाचे भोक्ते नव्हते. त्यांना सदोदित भक्तांच्या मेळाव्यात रहाण्याची आवड होती. त्यामुळे त्यांनी बुट्टींना दोन तीन वेळा सांगितले, "मला पुन्हा शेगावला जावयाचे आहे, तर त्याप्रमाणे मला पोचविण्याची व्यवस्था करावी." परंतु बुट्टींनी ही गोष्ट मनावरच घेतली नाही. त्यांनी मनाशी ठरविले होते की आता महाराजांना कायमच नागपूरला ठेवून घ्यावयाचे व शेगावला परत जाऊच द्यायचे नाही.

इकडे महाराजांची ही अवस्था तर तिकडे शेंगावला भक्तांची ही अवस्था निराळींच! अक्रूराने श्रीकृष्णाला गोकुळांतून वृंदावनात नेल्यामुळे ज्याप्रमाणे गोकुळ सुने सुने झाले, त्याप्रमाणेच श्रीगजानन महाराजांच्या भक्तांना शेगाव अत्यंत सुने सुने वाटू लागले व त्यांनी महाराजांना परत बोलावण्यासाठी निरोपे पाठविले. परंतु बुट्टींच्या वाड्यावरचे रखवालदार इतके पक्के होते की ते त्यांपैकी कोणालाच महाराजांपर्यंत पोंचूच देत नसत. मग महाराजांपर्यन्त त्यांच्या भक्तांची तळमळ पोचावी कशी? शेवटी महाराजांचा एक परम भक्त श्री. हरि पाटील याने नागपूरला जाऊन महाराजांना परत शेगावला घेऊन यावे असे ठरले. त्याप्रमाणे हरि पाटील आणखी दोन तीन भक्तांसह शेगावला गेले; परंतु नेहमी प्रमाणे त्यांच्या वाड्याच्या रखवालदारांनी पाटलांना अडविले व आत जाण्यास मज्जाव केला. पण हरि पाटील कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी ठरविले होते त्याप्रमाणे ते दंडेली करून आत घुसले व थेट महाराजांच्या पुढे जाऊन उभे राहिले. इकडे बुट्टींच्या घरी त्यांच्या इतमामाप्रमाणे भोजनाची पंगत मांडण्यात आली होती. चांदीची ताटे, चांदीच्या वाट्या व झांडी व त्यात निरनिराळ्या प्रकारची सुग्रास अशी पक्वान्ने वाढण्यात आली होती आणि मंडळी जेवणाची सुरवात करण्याच्या तयारीत होती. इतक्यात हरि पाटलाला समोर पाहिल्यावर महाराज ताटावरून उठले आणि हरि पाटलास म्हणाले, "हरि, बरे झाले तू आलास ते मला येथे मुळीच करमत नाही. चला आपण शेगावला परत जाऊ" श्री गजानन महाराजांचे हे बोलणे ऐकून बुट्टी फारच घाबरले. अशा तऱ्हेने जेवणावरून उठून महाराज निघून गेले असे नागपूरात कळल्यास आपली अब्रु पार धुळीला मिळेल हे जाणून त्यांनी हरि पाटलास अजिजीने विनविले व सर्व परिस्थिती स्पष्टपणे सांगून भोजन आटोपून शेगावला जाण्यास विनविले. सर्व परिस्थितीचा विचार करून हरि पाटलाने ते मान्य केले व सर्वांनी भोजन केले. भोजनोत्तर गोपाळरावांच्या पत्नी जानकीबाई ह्यांनी महाराजांची पूजा केली व महाराजांनी तिला आशीर्वाद दिला व ते शेगावला परत जाण्यास निघाले. श्रीमान बुट्टींना आपल्या

संपत्तीचा गर्व झाला होता; पण गजानन महाराजांसारख्या संपत्तीला मृत्तिकेप्रमाणे मानपान संताला त्याची काय पर्वा. तेव्हा त्यानी अशा प्रकारे बुट्टीचा गर्व हरण केला असे वर्णन श्रीगजानन विजय ह्या पोथीत आढळते. श्री बुट्टींचा उल्लेख साईसच्च-रितात "श्रीमान" असा आढळतो; पण त्यांना संपत्तीचा गर्व होता वगैरे असे काही सांगितलेले आढळत नाही. श्री गजानन महाराजांच्या महानिर्वाणानंतर श्री बुट्टी श्री साईबाबांकडे आकर्षित झाले होते असे दिसते तेव्हा एका संताने गर्व हरण केल्यामुळे पुढे त्यांचा गर्व नाहीसा होऊन ते लीन झाले असावेत व त्यांची पुढची वागणूक साईदरबारातील सर्वांशी नम्रतेची झालेली असावी असे दिसते.

शिरडीचा विकास कसा होत गेला ह्याचे वर्णन आपणास साई सच्चरित्रातील ४ थ्या अध्यायात दिसते. त्यामध्ये तेथे बांधण्यात आलेल्या तीन वाड्यांचा उल्लेख सापडतो. त्यात पहिला उल्लेख साठेवाड्याचा येतो. गुरुस्थानाच्या सन्निध असलेला वाडा साठे ह्यांनी जमीन खरेदी करून बांधला असे दिसते. त्यानंतरचा उल्लेख दीक्षितांच्या वाड्यांचा येतो. हल्लींचे भोजन गृह जेथे आहे तोच दीक्षित वाडा होय व ह्यानंतर "पुढे श्रीमंत बुट्टींचा इमला" अलोट पैका खर्च करून बांधण्यात आल्याचा उल्लेख त्या अध्यायात सापडतो. ह्या तीन वाड्यांचा ज्या क्रमाने उल्लेख केला आहे त्याच क्रमाने ते शिरडीस बांधले गेलें असावेत. हेमाडपंत बुट्टींच्या वाड्याविषयीं ह्याच ठिकाणी असे म्हणतात की, "ह्याच वाड्यांत श्री. बाबांचा देह विस्तावला आहे. तेव्हा श्री बुट्टींच्या पैंशाचे सार्थक झाले."

पुढे ४३ व्या अध्यायात ह्याच वाड्या विषयी आणखी काही माहिती मिळते. श्रीमंत बुट्टीं हे मोठे भाविक असे भक्त होते व पुढील भविष्य जाणूनच जणू काहीं त्यांनी हा टोलेजंग व सुखकारक वाडा बांधून ठेवला होता असे वाटतें. एकदा सहज बोलता बोलता बाबाही म्हणाले होते "वाडियांत पडो हे शरीर" ह्यावरून आपली समाधी ह्याच वाड्यात बांधावी असा त्यांचा मानस असावा असेही हेमाडपंत सांगतात.

पुढे ४४ व्या अध्यायात बाबांच्या महासमाधीनंतर बुट्टींच्या वाड्याच्या बांधणीच्या वेळीं काय घडले ह्याचे वर्णन करतांना हेमाडपंत लिहितात की, बाबा एकदा लेंडी बागेत चालले असता माधवरावानीं केलेल्या विनंतीनुसार ते वाड्यात आले. बुट्टींच्या वाड्यात मुरलीधराची स्थापना कोठे करावयाची हे ठरल्यामुळे तेथे खोदकाम करून गाभारा बांधण्याचे काम सुरु व्हावयाचे होते म्हणून माधवरावांनी श्री बाबांच्या हाती नारळ दिला. तेव्हा शुभवेळ पाहून बाबा म्हणाले, "फोडा नारळ

आपण सर्व बाळगोपाळ येथे जमून काळ घालवू व येथेच बसून सुखदुःखाच्या गोष्टी करू सर्व पोरासोरांना येथेच चित्तस्वास्थ्य लाभेल." एवढे वर्णन करून हेमाडपंत पुढे लिहितात की शेवटी अपेक्षेप्रमाणे मुरलीधराची स्थापना बुट्टींच्या वाड्यात झालीच नाही व महाराजच स्वतः मुरलीधर झाले. बुट्टींच्या वाडयाचा म्हणजेच सध्याच्या समाधीमंदिराचा हा इतिहास असा आहे !

साईसच्चरिताच्या तेराव्या अध्यायात बापूसाहेब बुट्टींना बाबांनी कसे व्याधि-युक्त केले ह्याचे वर्णन सापडते. एकदा बापूसाहेबांच्या पोटात थंडी झाली होती व त्यांना उलटया व जुलाब होऊ लागले. त्यांचे कपाट औषधांनी भरलेले होते पण त्यांतले एकही त्याना लागू पडेना तेव्हा ते फार घाबरले. त्यांना इतका अशक्तपणा होता की त्यांना बाबांच्याकडे पायी जाण्याचेही त्राण नव्हते. तेव्हा त्यांना इतरांनी उचलून बाबांकडे आणले. त्यांच्याकडे आपलीं तर्जनीं हलवून बाबा म्हणाले, "खबरदार आतापासूनी। मलविसर्जनी जाता नये ॥ वांतीही राहिली पाहिजे ठिकाणी." "ह्यापुढे हेमाडपंत म्हणतात," काय त्या बाबांच्या शब्दांचा दरारा ! त्यांच्या दोनही व्याधी भेदरल्या व त्यांनीं पोबारा केला आणि बुट्टींना आराम वाटला !

दुसऱ्यावेळी श्रीमान बुट्टींना असाच कॉलऱ्याचा उपद्रव झाला. वांत्या व रेच होऊ लागले. डॉ. पिल्ले शेजारीच होते. त्यानीं सर्व उपाय केले ते सर्व हरले तेव्हा ते बाबांकडे आले व त्यानीं बाबांना विचारले की त्यांना कॉफी द्यावी की नाही ? त्यावेळीं बाबांनीं सांगितले, "खा दूध, बदाम घाला । अक्रोड पिस्त्यासह तयाला । प्यायला द्या तरण ॥ तेणे तयाची राहील तहान होईल सत्वर व्याधीं हरण." पटकीं सारख्या रोगावरील बाबांचा हा उपाय सामान्याच्या दृष्टींने अगदींच विचित्र; पण बाबांच्या वाणीचा दरारा खरोखरच अगाध त्या "तरणाने" बुट्टीं खडखडींत बरे झाले !

साईसच्चरिताच्या २२ व्या अध्यायात बाबांनी सर्पापासून लोकांना कसे वाच-विले त्याचा उल्लेख आहे. त्यात अन्य उदाहरणांबरोबर सर्पाचाही व बुट्टींचाहि उल्लेख येतो. एकदा नाना डेंगळे म्हणून एक मोठे ज्योतिषी बापूसाहेबांना म्हणाले की, तुम्हाला आजचा दिवस फार अशुभ आहे. ते ऐकून बापूसाहेब फार अस्वस्थ झाले; पण बाबांनी सांगितले की, "तुम्हाला काही भीती नाही" पुढे बापूसाहेब शौचास गेले असता त्या ठिकाणी साप दिसला तो भयंकर विषारी होता. त्याला मारण्यासाठी तयारी करीत असता तो भोकातून निघून गेला व बापूसाहेबांच्यावर येणारे संकट टळले.

श्रीमान बापूसाहेब बुट्टी ह्यांची श्रीसाईबाबांच्यावर इतकी दृढ श्रद्धा होती व त्यांच्या भक्तीला श्रीबाबांचाही तितकाच प्रतिसाद होता हे वर केलेल्या सर्व वर्णनावरून वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. बाबांचा दृढ व दीर्घकाळच सहवास ज्या भक्तांना लाभला त्यांपैकीं श्रीमान बुट्टी हे एक होत आणि म्हणूनच साईबाबांच्या दरबारात त्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे होते ह्यात संशय नाही. धन्य ते अनन्य साईभक्त बुट्टी की ज्यांना साईबाबांचा दीर्घ सहवास लाभला आणि ज्यांना श्री साईबाबांनी आपला कृपा प्रसाद मुक्तहस्ताने दिलात.

---

## श्रीतात्याबाबा पाटील कोते

या परम श्रीसाईभक्तांचे वरील डॉ. गव्हाणकर यांचा लेख पुढील अंकात वाचा.

# गणराज्य श्रीसाईबाबा विशेषांक

संस्थापक-संपादक : बबनराव ढाकणे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जनतापक्ष.

## "गणराज्याच्या" १४ व्या वर्धापनदिनानिमित्त व श्रीसाईबाबांच्या ६० व्या पुण्यतिथी महोत्सववर्षानित्तमि

## — श्रीसाईबाबा विशेषांक —

प्रकाशित केला जात असून त्याचे प्रकाशन महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. शंकरराव चव्हाण व "शिर्डी के साईबाबा फेम" सुप्रसिद्ध अभिनेते श्री. मनोजकुमार यांच्या उपस्थितीत शिर्डी येथे मे-१९७९ च्या पूर्वार्धात होत आहे.

या विशेषांकात वाचा —

- श्रीसाईबाबांचे जन्मग्राम व गुरुसंबंधी प्रकाश टाकणारे लेख.
- श्रीसाईबाबांचे समकालीन संतांची माहिती.
- शिर्डी गांवचा इतिहास कथन करणारा खास लेख.
- ठिकठिकाणी असणारी श्रीसाईबाबांची मंदिरे व त्यांची माहिती.
- श्रीसाईभक्तांना आलेले चित्तथरारक, अजब अनुभवांची एक मालिकाच, भरपूर लेख, कविता, आठवणी आणि इतर बरेच काही .........
- शिर्डी संस्थानच्या कारभारावर प्रकाश टाकणारा खास लेख.

प्रत्येक साईभक्ताने आपल्या संग्रही ठेवावा अशा भरपूर छायाचित्रांनी नटलेल्या या विशेषांकाची नोंदणी ३.५० (तीन पन्नास) ची मनीऑर्डर खालील पत्यावर १५-५-१९७९ च्या आत करावी.

— व्यवस्थापक —

साप्ताहिक "गणराज्य"

बोरावके चाळ, कोपरगाव-४२३६०१.

जि. अहमदनगर.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६-०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६-२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६-५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७-५० |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८-०० |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०-०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५-५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०-३० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०-३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०-८० |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०-३० |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०-२५ |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २-०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ५-०० |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २-०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | ३-०० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५-०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | ४-५० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | १-२५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १-०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १-५० |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १-५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) सदानंद चेंदवणकर | १-०० |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | १-२५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३-२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०-०५ |
| (२७) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०-०५ |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०-१० |
| (२९) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६-०० |
| | प्रत्येक प्रत | ०-६० |